cmyk

## संपादकीय

### फक्त आरोप-प्रत्यारोप बाकी समस्या जैसे थे !

अधिवेशनकाळात जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष आणि आरोप-प्रत्यारोपांना प्राधान्य, हे सर्वपक्षीय मंत्री व आमदारांच्या कामकाजाचे स्वरूप पहावयास मिळाले. राज्याचे राजकारण सध्या मंत्री आणि आमदार यांचे आरोप-प्रत्यारोप यापलीकडे फारसे जात नाही. ३० जूनपासून पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली आणि शुक्रवार १८ जुलै हा अधिवेशनाचा अखेरचा दिवस होता.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### आ.रोहित पवारांच्या अडचणीत वाढ

मुंबई : राज्याची शिखर बँक आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी राष्ट्रवादीचे आ. रोहित पवार यांच्याविरुद्ध ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्राची विशेष कोर्टाने शुक्रवारी दखल घेतली. तसेच, फसवणुकीद्वारे केल्या गेलेल्या साखर कारखान्याच्या लिलावात पवार हे सहभागी असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न होते, असे निरीक्षण नोंदवून रोहित पवार यांच्यासह संबंधितांना न्यायालयाने समन्स बजावले आहे. या सर्वांना २१ ऑगस्ट रोजी कोर्टात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-८५ | रविवार, दि.२० जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### शुटिंगदरम्यान मोठा अपघात, शाहरुख खान गंभीर जखमी

मुंबई-बॉलिवूड अभिनेता किंग या चित्रपटाचे चित्रीकरण करत होता. दरम्यान, त्याचा मोठा अपघात झाला आहे. या अपघातामध्ये शाहरुख खान गंभीर जखमी झाला आहे. उपचारासाठी तो अमेरिकेला गेला आहे.

### प्रताप सरनाईक यांच्या दौऱ्याकडे तानाजी सावंतांची पाठ

धाराशिव-मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दौऱ्याकडे पुन्हा आमदार तानाजी सावंत यांची पाठ तर पालकमंत्री प्रताप सरनाईकांनीही सावंतांच्या मतदार संघात जाणे टाळले आहे. नाराज सावंतांचे पुतणे धनंजय सावंतांसह समर्थकही पालकमंत्र्यांच्या उपस्थितीतील कार्यक्रमाकडे फिरकले नाहीत. हरित धाराशिव मोहिमेला विशेष निमंत्रित असतानाही तानाजी सावंतांची दांडी असल्याचे दिसून आले.

### वेबसाईटवर अंबाबाईविषयी वादग्रस्त मजकूर

तुळजापूर : पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वेबसाईटवरील मजकुरामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. वेबसाईटवरील मजकूर चुकीचा असल्याचे सांगत प्रजासत्ताक सामाजिक सेवा संघटना आक्रमक झाली आहे. अंबाबाईविषयीचे अनेक उल्लेख धार्मिक परंपरेला धरून नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच सदर मजकूर तातडीने हटवून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### २४ जुलैनंतर राज्यात पाऊस पुन्हा सक्रिय होणार

मुंबई : जूननंतर जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यात दडी मारल्यानंतर दोन दिवस पाऊस झाला. आता २४ जुलैनंतर राज्यात पाऊस पुन्हा सक्रिय होणार असून २४ जुलै ते ७ ऑगस्ट जोरदार पाऊस बरसणार आहे. महाराष्ट्रासह मध्य भारतात पावसाचा अंदाज असून मराठवाड्यात सरासरीहून अधिक पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात चांगल्या पावासाचा अंदाज असून हवामान विभागाने शुक्रवारी जारी केलेल्या हवामान अंदाजात ही माहिती देण्यात आली आहे.

### राज ठाकरें विरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात सुप्रिम कोर्टात भाषेच्या वादावरुन याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेतून राज ठाकरेंवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली असून मुंबईतील वकील घनश्याम दयालू उपाध्याय यांनी ही याचिका दाखल केली आहे. या याचिकेत महाराष्ट्र सरकार आणि भारतीय निवडणूक आयोगासह इतर अधिका-यांना पक्षकार करण्यात आले आहे.

# एक दिवस शेतकऱ्यांसाठी द्या!

## कर्जमाफिसाठी २४ जुलैला चक्का जाम, आता माघार नाही-बच्चू कडू

मुंबई । प्रतिनिधी

**ठाकरे सरकार कोसळल्यानंतर अगोदर शिंदे सरकार आणि आता फडणवीस सरकारच्या कार्यकाळात राज्यातील शेतकऱ्यांकडून वारंवार कर्जमाफीची मागणी पुढे करण्यात येत आहे. मात्र पावसाळी अधिवेशनात सुध्दा यावर एक शब्द सुध्दा सरकारकडून बोलले गेले नाही. त्यामुळे आता शेतकऱ्यांसाठी एक दिवस द्या, असे आवाहन करीत प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसाठी दि. २४ जुलै रोजी चक्का जाम आंदोलनाचा नारा दिला आहे. तसेच कर्जमाफी मिळत नाही, तोपर्यंत माघार नसल्याचा इशारा सुध्दा त्यांनी दिला आहे.**





प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी २४ जुलै रोजी राज्यव्यापी चक्का जाम आंदोलनाची घोषणा केली आहे. जोपर्यंत कर्जमाफीसंदर्भात ठोस तोडगा निघत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असे त्यांनी ठामपणे सांगितले. कर्जमाफीच्या मुद्द्यावर सरकारकडून असमाधानकारक आणि टाळाटाळीची उत्तरे मिळत असल्याने महाराष्ट्रभर चक्का जाम आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पान २ वर

### अधिवेशनात सरकारकडून शब्दही नाही

कर्जमाफी जाहीर करण्याची मागणी राज्यातील शेतकऱ्यांकडून वारंवार होत असून बच्चू कडू यांच्या उपोषणादरम्यान सरकारकडून कर्जमाफीसंदर्भात सकारात्मक विचार असल्याचे सांगितले होते. मात्र पावसाळी अधिवेशनात सरकारकडून शेतकरी कर्जमाफीवर एक शब्द सुध्दा काढण्यात आला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

## तटकरेंकडून पुन्हा विलिनीकरण बॉम्ब!

### ..तर भाजपला विचारावे लागेल-सुनिल तटकरे

हिंगोली । प्रतिनिधी

**आम्ही सत्तेत सहभागी होताना भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली होती. त्यामुळे विलिनीकरणाचा प्रस्ताव आला तर भाजपच्या नेत्यांना विचारावे लागेल असे वक्तव्य सुनील तटकरे यांनी हिंगोलीत केले आहे. तटकरेंच्या या वक्तव्याने राज्यात पुन्हा खळबड उडाली असून शरद पवार गटाच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांमध्येही अस्वस्थता वाढू लागली आहे.**



गेल्या अनेक दिवसापासून राज्यात दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा आहे. त्यातच आता सुनिल तटकरे यांनी विलिनीकरण बॉम्ब टाकल्याने खळबळ उडाली आहे. ते म्हणाले, आम्ही एनडीएत आहोत, त्यामुळे आमच्यासोबत येणाऱ्यांनाही एनडीएत राहावे लागेल असेही तटकरे म्हणाले.

राष्ट्रवादी विलिनीकरणाची चर्चा स्थानिक पातळीवरती सुद्धा नाही आणि वरिष्ठ पातळीवरही पान २ वर

## गुड न्यूज ! बीडला होणार रेल्वेचे जंक्शन

### धाराशिव -बीड- छ. संभाजीनगर रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण सुरू

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असलेल्या धाराशिव -बीड- छ. संभाजीनगर प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या कामाला गती मिळायला सुरुवात झाली आहे. या प्रस्तावित रेल्वेमार्गाच्या हवाई आणि जमिनी पाहणीचे आदेश मध्य रेल्वेच्या वतीने देण्यात आले दोन दिवस हेलिकॉप्टर मधून हवाई पाहणी चालणार आहे.**



अहमदनगर बीड परळी या रेल्वे मार्गासाठी १९८३ पासून रेल्वे आंदोलन कृती समिती पाठपुरावा करत आहे त्याला स्व केशर काकू स्व गोपीनाथ मुंडे यांनी बळकटी दिली यासाठी अनेक आंदोलने झाली आता कुठे हा मार्ग प्रगतीपथावर आहे, येत्या वर्षभरात हा रेल्वे मार्ग पूर्ण करण्याचे प्रयत्न रेल्वे विभाग स्थानिक लोकप्रतिनिधी करत असतानाच आता जिल्ह्यासाठी महत्वाच्या असलेल्या आणखी एका रेल्वेमार्गाला गती मिळणार असल्याचे पान २ वर

### शिक्षकांच्या खात्यात जमा होणार अनुदान

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबईच्या आझाद मैदानात मागील आठवड्यात विनाअनुदानित शिक्षकांचे विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरू होते. या आंदोलकांना अखेर यश आले असून येत्या १ ऑगस्टपासून शिक्षकांच्या खात्यात अनुदान जमा होणार असल्याची घोषणा राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत केली आहे.**

राज्य सरकारने ऑक्टोबर २०२४ मध्ये शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला होता. या निर्णयानुसार सुरुवातीला २० टक्के अनुदान देण्यात येणार होते. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी झाली नव्हती. शाळांना प्रत्यक्ष निधी वितरित करण्यात आलेला नव्हता. पान २ वर

## घरकुलसाठी पात्र लाभार्थींनी सेल्फ सर्व्हे करून घ्यावा-आ.संदीप क्षीरसागर

### ग्रामीण भागातील घरकुलच्या सेल्फ सर्व्हेला ३१ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून त्याकरिता ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्यासाठी ३१ जुलै ही अंतिम मुदतवाढ मिळाली आहे. ३१ जुलै पर्यंत नागरिकांना मोबाईल ॲपद्वारे सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३१ जुलै पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सध्या सद्या सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी/ ग्रामसेवक यांचे मार्फत किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी पान २ वर

## प्रेम प्रकरणातून युवकाला जबर मारहाण; उपचारादरम्यान मृत्यू

तलवाडा । प्रतिनिधी

**गंगावाडी तालुका गेवराई या ठिकाणी प्रेमप्रकरणामधून एका तरुणाला झालेल्या जबर मारहाणीमध्ये गंभीर जखमी अवस्थेत संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता उपचार सुरू असताना या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली याप्रकरणी**

### तलवाडा पोलिसांनी एकाला घेतले ताब्यात तर चार आरोपी फरार



**तलवाडा पोलिसांनी यातील एका आरोपीला ताब्यात घेतले असून अन्य आरोपी फरार आहेत.**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील गंगावाडी येथील युवक शिवम पान २ वर

## अर्चना कुटेंना अटक करण्याचा सीआयडीला अधिकार-एसपी कॉवत

बीड । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टिस्टेट घोटाळा प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला असून त्यामुळे बीड पोलिसांचा तपासाशी आता संबंध नाही. यामुळे आरोपी अर्चना कुटे यांना अटक करण्याचा अधिकारही केवळ सीआयडीकडे आहे, असा खुलासा पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांनी केला. दुसरीकडे, या प्रकरणात अर्चना कुटेंना केव्हा अटक होणार आणि त्यांच्या मालमत्तेचा लिलाव कधी होणार, पान २ वर






## पारगाव नजीक भीषण अपघात दोन तरुण जागीच ठार:दोन गंभीर

चौसाळा । प्रतिनिधी

**राष्ट्रीय महामार्ग धुळे सोलापूर वर पारगाव जवळ मध्यरात्री एक्स यु व्ही ७०० महिंद्रा कंपनी कार क्र.एम.एच.२० एच.बी.९७७६ चा भीषण अपघात झाला.या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला तर दोघे जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथे उपचार सुरू आहेत.** पान २ वर



### गुंडांना पक्षात घेणार नाही, जीआर काढा-खा.संजय राऊत

मुंबई-गुंडांना पक्षात घेणार नाही, फडणवीसांनी जीआर काढावा असे आवाहन शिवसेना नेते खा.संजय राऊत यांनी केले आहे.

## शासनाचा मोठा निर्णय; केंद्र प्रमुखांची पदे भरणार

### ग्रामविकास विभागाची अधिसुचना जाहीर; शिक्षणाचा दर्जा सुधारणार



प्रविण तांबडे /कळंब

**राज्यामध्ये जून २०२३ पासून परीक्षा फॉर्म भरून ही आजपर्यंत विभागीय केंद्रप्रमुख भरती झालेली नाही. ही विभागीय केंद्रप्रमुख भरती परीक्षा रखडलेली आहे. यातली मूळ अडचण अशी होती की ग्रामविकास विभागाने अधिसूचना प्रसिद्ध करणे बाकी होते. मात्र ग्रामविकास विभागाने दि. १९ जुलै रोजी केंद्र प्रमुख पदे परिक्षा व पदोन्नतीने भरण्यासंदर्भात अधिसुचना काढली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांना हक्काचे केंद्रप्रमुख मिळणार आहेत.**

शिक्षण व्यवस्थेतील प्राथमिक विभागात केंद्रप्रमुख हे पद अतिशय महत्त्वाचे व ग्राऊंड लेवलवरील असल्यामुळे आणि राज्यात आजघडीला जवळपास ८० टक्के शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यासह गटशिक्षणाधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. तर या पदाचा कार्यभार प्रभारीवर सुरु आहे. जून २०२३ पासून केंद्रप्रमुखाची पदे राज्यात भरली नव्हती. परिक्षा फॉर्म भरण्यात आली होती. तसेच पदोन्नती सुध्दा रखडल्या होत्या. शेवटी ग्रामविकास विभागाने ही पदे भरण्यासंदर्भात दि. १९ जुलै रोजी अधिसुचना काढली असून केंद्र प्रमुखाची पदे भरण्याचा मात्र मोकळा झाला आहे. सदरील आदेशान्वये लवकरच पदोन्नतीने आणि परीक्षेद्वारे कायम हक्काचे पान २ वर

## जिल्हा कारागृहातील कैद्याकडे सापडला गांजासदृश पदार्थ

### शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल; दोन पंचासमक्ष केला पंचनामा




बीड । प्रतिनिधी

**वाल्मिक कराड शिक्षा भोगत असलेल्या बीड जिल्हा कारागृहात एका आरोपीकडून गांजासदृश पदार्थ सापडल्याने खळबळ उडाली आहे.** या प्रकरणी शिवाजी नगर पोलिस ठाण्यात एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून जेलमध्ये अमली पदार्थ नेमकं कोण पुरवतंय? याविषयी प्रश्न उपस्थित केला जात आहे.

संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपी जिल्हा कारागृहात आल्यापासून कोणत्या ना कोणत्या कारणामुळे जिल्हा कारागृह चर्चेत आहे. काही पान २ वर

### नेमकं काय सापडले कैद्याकडे?

सुभेदार बलभीम चिचाणे आणि पोलीस हवालदार अब्दुल वाजेद अब्दुल अजिज हे कर्तव्यावर असताना बराक क्रमांक ७ मध्ये न्यायालयीन कोठडीत असलेल्या बंदी अक्षय ऊर्फ चिंटू मिठ्ठू गायकवाडची हालचाल संशयास्पद वाटली. त्याची झडती घेतली असता, त्याच्या अंडरविअरमध्ये रबरी फिकट आकाशी रंगाचा चिरलेला बॉल आढळून आला, ज्यामध्ये गांजासदृश पदार्थ सापडला. तसेच, त्याच्या पँटच्या खिशात असलेल्या पुडीत हिरवट रंगाचा पाला, बारीक भुरकट पदार्थ, हिरवट रंगाची फुले, बिया, बोंडे आणि काड्या असा अंमली पदार्थसदृश मुद्देमाल मिळाला.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू:९.५० क्विंटल | २,४६६ | २,७५३ | २,६४६ |
| ज्वारी/हायब्रिड : ३३.०० क्विंटल | २,००१ | २,७९१ | २,३७१ |
| मका/लोकल:१०.५०क्विंटल | २,१५१ | २,१५१ | २,१५१ |
| तूर :२५.०० क्विंटल | ५,६०० | ५,६०० | ५,६०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,१०० | २,८२४ | २,५७५ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,७०० | ६,१५० | ५,९२५ |

cmyk

cmyk



अग्रलेख

# फक्त आरोप-प्रत्यारोप; बाकी समस्या जैसे थे !

अधिवेशनकाळात जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष आणि आरोप-प्रत्यारोपांना प्राधान्य, हे सर्वपक्षीय मंत्री व आमदारांच्या कामकाजाचे स्वरूप पहावयास मिळाले. राज्याचे राजकारण सध्या मंत्री आणि आमदार यांचे आरोप-प्रत्यारोप यापलीकडे फारसे जात नाही. ३० जूनपासून पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली आणि शुक्रवार १८ जुलै हा अधिवेशनाचा अखेरचा दिवस होता. आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्यासाठी लोकप्रतिनिधी सभागृहात उपस्थित असतो; मात्र सभागृहात गट-तटाचे राजकारण सुरू आहे, अशी खंत विधानसभेचे सदस्य बाबा काळे यांनी अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर चर्चा करताना व्यक्त केली. सर्वच राजकारणी गुंड प्रवृत्तीचे आहेत असे नाही. परंतु ज्या सभागृहात आपण बसतो त्या सभागृहाचे महत्त्व काय, याचा विचार सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी करणे गरजेचे आहे. अन्यथा गुरुवारी विधानभवनाच्या लॉबीतच जशी हाणामारीची घटना घडली, तशा घटनांची भविष्यात पुनरावृत्ती होत राहणार, हेही तितकेच खरे.

महाराष्ट्र विधीमंडळाचे देशात आगळेवेगळे स्थान आहे. देशातील विधीमंडळांचा उल्लेख होताना महाराष्ट्राच्या विधीमंडळाचा उल्लेख आवर्जून केला जातो. शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा महाराष्ट्र, अशी महाराष्ट्राची जगभरात ओळख. महाराष्ट्र विधानभवनाच्या माध्यमातून राज्यासाठी कायदे बनवणे, लोकांच्या गरजा व समस्यांवर विचार करत कायदे पारित करणे, सरकार योग्य प्रकारे काम करते की नाही, हे तपासणे आणि गैरव्यवहार झाल्यास जाब विचारणे, हे विधीमंडळाचे मुख्य कार्य. विधीमंडळ हे लोकांचे प्रतिनिधित्व करते. लोकांच्या भावना, समस्या आणि गरजा लोकप्रतिनिधींनी सभागृहात मांडणे अपेक्षित असते. शेतकऱ्यांचे प्रश्न, शक्तिपीठ महामार्गाला विरोध, ठाणे - बोरिवली दरम्यान दुहेरी बोगद्याच्या प्रकल्पात तीन हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा विरोधकांचा आरोप, अशा विविध मुद्द्यांवर आवाज उठवत पावसाळी अधिवेशनाला ३० जून पासून सुरुवात झाली. आरोप-प्रत्यारोपात दिवसभराचे कामकाज पूर्ण होते. मात्र यात सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांचे काय? अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यापासून ते अखेरच्या दिवसापर्यंत जनतेला काय मिळाले, याचा विचार लोकप्रतिनिधींनी करणे गरजेचे आहे. गुरुवारी तर भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते भिडले, तेही विधानभवनाच्या लॉबीत. मुंबईत टाचणी पडली तरी त्याची चर्चा जगभर होते, त्यामुळे विधानभवनात हाणामारीची घटना घडली, तर त्याची चर्चा तर होणारच; मात्र यामुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलीन होतेय, याचा विचार लोकप्रतिनिधींनी करणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, आमदार हे जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी असतात. जनतेचे प्रश्न सोडवणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी असते. जनतेचे सेवक म्हणून लोकप्रतिनिधींना निवडून सभागृहात पाठवले जाते. लोकप्रतिनिधींकडून जनतेच्या भरपूर अपेक्षा असतात. दर्जेदार आरोग्य सुविधा, खड्डेमुक्त रस्ते, मुबलक पाणी, कचरामुक्त राज्य, या सर्वसामान्य जनतेच्या मापक अपेक्षा असते. आपल्या मतदारसंघातील समस्यांचे निवारण, पायाभूत सुविधा मिळणे, यासाठी मोठ्या विश्वासाने मतदार राजा लोकप्रतिनिधींना निवडून विधानसभेत पाठवतो. जनतेच्या प्रश्नांवर वेळोवेळी बैठका, चर्चा होतात. जनतेच्या प्रश्नांवरून लोकप्रतिनिधी सरकारी यंत्रणेला धारेवरही धरतात. मात्र जनतेचे प्रश्न जैसे थे राहतात. १५ दिवस चाललेल्या अधिवेशनात फक्त आणि फक्त आरोप-प्रत्यारोप; बाकी जनतेच्या समस्या जैसे थे. त्यात लोकप्रतिनिधींच्या कार्यकर्त्यांची हाणामारी अधिवेशनातील चर्चेचा विषय ठरली; मात्र या घटनेमुळे राज्यातील लोकप्रतिनिधींची प्रतिमा काय, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

गुरुवारी सायंकाळी विधानभवनाच्या लॉबीत घटना घडली आणि लोकप्रतिनिधींच्या प्रतिक्रिया उमटल्या. चूक कोणाची, दादागिरी कोणाची, यावर लोकप्रतिनिधींनी लक्ष केंद्रित केले. असे होणे चुकीचे, पुन्हा अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कडक कायदा करावा. विधीमंडळ परिसराची सुरक्षा कडक करावी, अशा विविध प्रकारच्या प्रतिक्रिया लोकप्रतिनिधींनी दिल्या; मात्र पक्षात अशा प्रकारे गुंडागर्दी करणे खपवून घेणार नाही, थेट त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा प्रकार दिसून आला नाही. समज दिली, पुन्हा असे होणार नाही, असा विश्वास पक्षाच्या प्रमुखांकडून व्यक्त करण्यात आला; मात्र कारवाई करण्याकडे दुर्लक्षच. विधीमंडळ असो वा उपहारगृह, किमान लोकप्रतिनिधींकडून गुंडागर्दी होणार नाही, याची शाश्वती आजच्या घडीला मिळणे अशक्य वाटते. परंतु, अपेक्षा करूया की भविष्यात विधीमंडळ परिसरात तरी हाणामारीची घटना होणार नाही.

# खा.सोनवणेंच्या प्रयत्नातून दिव्यांग,जेष्ठांना कृत्रिम साहित्य मिळणार

## मोफत साहित्येसाठी दिव्यांग,जेष्ठांनी कागदपत्रसह उपस्थित रहावे-खुर्शीद आलम

**बीड । प्रतिनिधी**

**जेव्हा पासून बजरंग बप्पा सोनवणे बीडचे खासदार झाले तेव्हा पासून बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे कामे दिसून येत आहेत याच अनुषंगाने समाज कल्याण विभाग आणि एलिम्को मुंबईच्या संयुक्त विद्यमाने बीड तालुक्यातील दिव्यांगांना व जेष्ठ नागरीकांना मोफत कृत्रिम साहित्य वाटप करण्याच्या अनुषंगाने दि.२१ जुलै रोजी सकाळी १० ते ५ पर्यंत पंचायत समिती बीड येथे पूर्व तपासणी शिबीराचे उद्घाटन खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते होणार असून शिबीरात सर्व दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांनी कागदपत्रांसह उपस्थित रहावे असे आवाहन मा. सभापती खुर्शीद आलम यांनी केले आहे,**



या शिबीरामध्ये दिव्यांगांना जयपुरी फुट, कृत्रिम हात पाय,व्हिल चेअर, ट्रावसिकल, क्रचेस, वॉकींग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र तर जेष्ठ नागरीकांसाठी बेल्ट, वॉकर, काठ्या, चष्मे, कृत्रिम दात, खुबड, कृत्रिम अवयव, कानाची मशिन, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीचेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर सह इतर साहित्य मिळविण्यासाठी शिबिरात येताना नागरिकांनी यु.आय.डी.कार्ड, आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला / रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे मासिक २२५०० किंवा वार्षीक २७०००० च्या आत तर जेष्ठ नागरिकांनी आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला/ रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे (मासिक १५००० किंवा बार्षीक १८०००० च्या आत असावे वगैरे कागदपत्रे सोबत घेऊन यावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदपवारचे शहराध्यक्ष तथा मा. सभापती खुर्शीद आलम यांनी केले आहे.

# खडकी गावात हरित धाराशिव अभियानांतर्गत ३००० झाडांचे वृक्षारोपण

**खडकी । पतिनिधी**

**''हरित धाराशिव'' या पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत खडकी गावात ३००० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाचा शुभारंभ तहसीलदार हेमंत डोकले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.**



या वेळी गावचे सरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, मंडळ अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यालय डिकसळ, जिल्हा परिषद या दोन्ही शाळेतील शिक्षक तसेच विद्यार्थी , रोजगार सेवक तसेच गावातील काही वृद्ध नागरिक यांनीही सक्रिय सहभाग घेतला. गावातील नागरिकांनी पर्यावरण संवर्धनासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमामुळे गावात हरित पट्टा निर्माण होऊन पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल, असा विश्वास तहसीलदार हेमंत डोकले यांनी व्यक्त केला. गावच्या विकासात लोकसहभाग महत्त्वाचा असून पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# प्रलंबित कामाचे कार्यालयीन वेळेत निपटारा करा-सीईओ मीन्नु

**जालना । प्रतिनिधी**

**प्रलंबित कामे वेळेत पूर्ण केले नाही तर त्याचे पगार अदा करू नयेत असे आदेश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) राजेंद्र तुबाकले व कॅफो राजू सोळंके यांना दिले आहेत.**



पण सर्व शाळेतील शिक्षक पण शनिवारी आणि रविवारी शाळेत थांबून सर्व कामे पूर्ण करतील. शाळा सुरू राहणार नाही पण शिक्षक शाळेत येऊन कामे करतील जिल्हा व तालुकास्तरावर केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वकांक्षी असलेल्या विविध योजनाची माहिती अद्यावत करणेसाठी व आपआपल्या स्तरावर प्रलंबित असलेले कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी येत्या शनिवारी व रविवारी कार्यालय सुरु ठेवावेत असे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नु पी.एम यांनी कार्यालय प्रमुखांना दिले आहेत. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नु यांनी पदभार घेतल्यापासून विविध विभागा आढावा बैठकांचा धडाका सुरु केला आहे. जिल्हा परिषदेच्या परिसरातील स्वच्छतेच्या कामासह तालुकास्तरीय बैठकीच्या वेळी काही विभागाची माहिती अद्यावत नसल्याचे दिसून आले. यामुळे हि सर्व माहिती अद्यावत करण्यासाठी शनिवारी व रविवारी जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यालय सुरु ठेवून माहिती सह प्रलंबित कामे करण्याचे आदेश दिले आहेत. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत घरकुल योजना , एकात्मिक बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य , बांधकाम विभाग, स्वच्छ भारत मिशन, कृषी, पशु संवर्धन या विभागाचा यात समावेश आहे. गटविकास अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त कर्मचारी यांच्या कडून सदरील कामे करून घेणेसाठी विशेष कॅम्प आयोजित करणेबाबत सूचित केले आहे. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांना सदरील बाबीचे सनियंत्रण अधिकारी तसेच डीआरडीए प्रकल्प संचालक घरकुल सुनीलकुमार पठारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी उदयसिंग राजपूत यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस व पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी रक्तदान शिबिराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**



**महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व राज्याच्या पर्यावरण पशुसंवर्धन व हवामान बदल मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून दिनांक २२ रोजी बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी कार्यालय चाणक्यपुरी नाट्यगृह रोड येथे सकाळी १० ते सायं ४ वा. रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांनी केले आहे .**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा दिनांक २२ जुलै रोजी वाढदिवस असून बीड जिल्ह्याच्या नेत्या व राज्याच्या पर्यावरण पशुसंवर्धन आणि हवामान बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस २६ जुलै रोजी आहे. भारतीय जनता पार्टीच्या या दोन्ही नेत्यांच्या वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीने ठरवले असून त्यानिमित्त जिल्हाभर रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले असून जिल्ह्यातील सर्व मंडळात व तालुक्यात मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे .या रक्तदान शिबिरात सर्वांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे व रक्तदान करावे अशा प्रकारचे आवाहन जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.

# डॉ.कल्याण काळे यांचा वाढदिवस साजरा

**जालना । प्रतिनिधी**

**१९ एप्रिल रोजी खासदार कल्याण काळे यांचा वाढदिवस जालना लोकसभा मतदार संघात धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. जालना येथील मातोश्री लॉन्स येथे खा. कल्याण काळे यांचा अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या अभिष्टचिंतन सोहळ्यात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.**

महाविकास आघाडीच्या नेत्यांसह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह विविध राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी देखील खा. डॉ. कल्याण काळे यांना शुभेच्छा दिल्या. खा. काळे यांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लढविल्या जाणार असल्याचे सांगितले. यावेळी माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, उबाठा शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भास्कराव अंबेकर, राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, रामराव खडके, ज्ञानेश्वर भांदरगे, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते इकबाल पाशा, माजी जि. प. सदस्य ज्ञानदेव पायगव्हाणे, रमेश गव्हाड, नवाब डांगे, राजेंद्र राख, कल्याण दळे, बबलू चौधरी, अब्दुल रशीद पहेलवान, शिवाजी शेजुळ, हरीहर शिंदे, रामधन काळंबे, जयप्रकाश चव्हाण, दिनेश काकडे, राम शिरसाट, कपील जिगे, विजय चौधरी,



अजय बनकर, अरुण सरदार, कुंडलराव मुठे, विनोद यादव, त्र्यंबकराव पाबळे, अतिक खान, रमेश सपकाळ, मुरलीधर शेजुळ, मुरलीधर थेटे, समाधान शेजुळ, लक्ष्मण म्हसलेकर, बदर चाऊस, विनोद रत्नपारखे, जावेद भाई, आरेफ शेख, कृष्णा पाटील पडूळ, रहिम तांबोळी, रामजी सावंत, डॉ. बळीराम बागल, यांच्यासह शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# पान १ वरून...

## एक दिवस शेतकऱ्यांसाठी

बच्चू कडू यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत ठोस तारीख आणि निर्णय जाहीर होत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरू राहणार असल्याचा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे. या आंदोलनामुळे राज्यातील वाहतुकीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी हे आंदोलन आणखी तीव्र केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

-----------

## गुड न्यूज ! बीडला होणार

चित्र आहे. अर्थसंकल्पात धाराशिव -बीड- छ. संभाजीनगर या रेल्वेमार्गाच्या सर्व्हेक्षणासाठी तरतूद करण्यात आली होती. तसेच हा प्रस्तावित रेल्वे मार्ग महत्वाचा असल्याने या मार्गाबाबत रेल्वे मंत्रालयाकडून संपूर्ण पाठपुरावा सुरु आहे.या रेल्वे मार्गाच्या प्राथमिक सर्व्हेक्षणाचे कार्यात आदेश मध्य रेल्वेने आरवी इंजिअरिंग कन्सल्टन्सी हैद्राबाद यांना दिले असून आता संबंधितांनी या रेल्वेमार्गाची हवाई आणि जमिनी पाहणी सुरु केली आहे. शुक्रवार ते रविवार या तीन दिवसात कंपनीच्या माध्यमातून या रेल्वेमार्गाची हवाई आणि जमिनी पाहणी केली जाणार आहे. त्यासाठी हेलिकॉप्टरचा वापर करण्यात येत असून कंपनीने तसे जिल्हाप्रशासनाला कळविले आहे. काल आरवीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे हेलिकॉप्टर बीडच्या अवकाशातून उडाले होते , आता आणखी दोन दिवस ही पाहणी होणार असून त्यानंतर सदरचा अहवाल मध्यरेल्वेकडे सोपविला जाणार आहे. त्यानंतर पुन्हा एकदा जमिनीवरची पाहणी आणि सर्वेक्षण केले जाणार आहे त्यामुळे हा मार्ग जर झाला तर बीड जंक्शन होईल आणि विकासाला गती मिळेल यात शंका नाही तसे पाहता सोलापूर धुळे हा मार्गही आता अस्तित्वात येईल सोलापूर ते तुळजापूर पर्यंतचा मार्ग झाला आहे पुढे तुळजापूर येडशी बीड ते छत्रपती संभाजी नगर हा मार्ग झाल्यास आणि इकडून अहिल्यानगर बीड परळी हा मार्ग पूर्ण झाल्यास बीड मध्यबिंदू असल्याने बीडला रेल्वेचे जंक्शन होण्याची दाट शक्यता आहे ही बीड जिल्हा वाशियांसाठी आनंदाची बातमी आहे.

-----------

## तटकरेंकडून पुन्हा

झाली नाही हे मी वारंवार स्पष्ट केले आहे. ज्यावेळी असा काही प्रस्ताव असेल त्यावेळी कोअर कमिटी त्याबाबत निर्णय घेईल. पण त्यावर निर्णय घेत असताना, भाजपच्या नेतृत्वाला विचारावे लागेल असे सुनील तटकरे म्हणाले.

**अजितदादा मुख्यमंत्री व्हावे अशी इच्छा**

सुनील तटकरे म्हणाले की, अजितदादा राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत ही माझ्यासहित पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याची इच्छा आहे. परंतु आम्ही राजकीय वास्तववादी आहोत, जमिनीवरती आहोत. आम्हाला वास्तव कळतं. भाजपचे १३१ आमदार आहेत, शिवसेनेचे ६० आमदार आहेत आणि राष्ट्रवादीचे ४१ आमदार आहेत. त्यामुळे आघाडीच्या युतीच्या राजकारणाची अपरिहार्यता कशी होईल त्यावर हे सगळं अवलंबून आहे.

**भुजबळांकडून समर्थन**

दरम्यान, सुनील तटकरे यांच्या वक्तव्याचे मंत्री छगन भुजबळांनी समर्थन केले असून तीनही पक्ष सत्तेत एकत्र आहोत, त्यामुळे विचारले गेले तर ठीक आहे असे भुजबळ म्हणाले.

----------

## प्रेम प्रकरणातून युवकाला जबर

काशिनाथ चिकणे वय वर्षे २१ रा गंगावाडी गावातील नात्यातील मुली सोबत प्रेम संबंध होते या प्रेम संबंधाची माहिती मुलीच्या घरच्यांना मिळाली असता मुलीच्या नातेवाईकांनी पाच जणांनी तलवाडा गंगावाडी रोडवर शिवम चिकणे हे आपल्या दुचाकीवरून गावाकडे जात असताना दिं.१८/७/२०२५ रोजी दुपारी तीनच्या सुमारास त्याला आडविले व त्याला काठ्याने व लाथा बुक्क्याने जबर मारहाण केली व त्याचे डोक्याला जास्त लागल्याने त्याला उपचारासाठी औरंगाबाद येथे हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते परंतु डोक्याला मार जास्त लागल्याने उपचार दरम्यान दिं. १९ रोजी दुपारी शिवम काशिनाथ चिकणे या युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मयत शिवम चिकणे हा विध्यार्थी माजलगाव येथे दोन वर्षापासून इंजिनीयर कोर्स करत होता हे शेवटचा वर्ष होता त्याचा अशी माहिती समोर आली आहे.या याप्रकरणी आरोपी १)शिवम गणेश यादव, २)सत्यम छगन मांगले,३) गणेश सुखदेव यादव,४) राजाभाऊ उत्तम यादव,५) ईश्वर गोवर्धन यादव, सर्व राहणार गंगावाडी, यांच्या विरोधात फिर्यादी काशिनाथ त्रिंबक चिकणे यांच्या फिर्यादीवरून कलम १०९,१२६,(२),१८९,(२),१९१(२),१९१(३) १९०, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला सापोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास उपनिरीक्षक स्वापनिल कोळी करीत आहेत.

-------------

## घरकुलसाठी पात्र लाभार्थींनी सेल्फ

प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करून घ्यावी, नोंदणी करण्यासाठी अंतिम मुदतवाढ मिळालेली आहे. ३१ जुलै २०२५ ही शेवटची तारीख असून त्या अगोदरच बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपले सर्वेक्षण करुन घ्यावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

**अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे**

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस- २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले-स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे अॅप देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून अॅपवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्च्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा. जर स्मार्टफोन उपलब्ध नसेल किंवा तांत्रिक बाबी हाताळण्यास अडचण येत असल्यास आपल्या गावचे ग्रामसेवक यांच्यामार्फतही सर्व्हे करून घरकुलसाठी अर्ज करता येतो.

-------------

## शिक्षकांच्या खात्यात

या निर्णयानंतर दोन अधिवेशनं पार पडली, तसेच तिसरे अधिवेशन सुरू असतानाही सरकारकडून टप्पा अनुदानासाठी आवश्यक असलेली पुरवणी मागणी सादर करण्यात आली नव्हती. परिणामी, शिक्षक समन्वय संघाने तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा पवित्रा घेतला. या पार्श्वभूमीवर शिक्षक समन्वय संघाकडून मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन सुरू करण्यात आले होते. खासगी विनाअनुदानित आणि अंशत: अनुदानित शाळा आणि कार्यरत शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचा-यांना येत्या १ ऑगस्टपासून वेतन अनुदानाचा पुढील टप्पा देण्यासाठी आवश्यक निधीस मंत्रिमंडळात मंजुरी देण्यात आली आहे. या वेतनासाठी दरवर्षी ९७० कोटी ४२ लाख रुपये एवढा खर्च होणार आहे.

----------------------

## पारगाव नजीक भीषण अपघात

दि.१८ जुलैच्या मध्यरात्री पारगाव जवळ गावच्या उत्तरेकडे २ की.मी.अंतरावर राष्ट्रीय महामार्गावर बीड कडून सोलापूर कडे जात असलेल्या वळण रस्त्याचा अंदाज न आल्याने भरधाव वेगात असणाऱ्या गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडीने चार ते पाच पलटी मारल्या.या अपघातामध्ये ऋषिकेश सुदाम औताडे वय २५ व अजिक्य अंबादास लेंबे दोघेही रा.हर्सूल ता.जी.छत्रपती संभाजी नगर यांचा जागीच मृत्यू झाला.तर गाडीतील रोहन जाधव व मयूर गव्हाडे हे गंभीर जखमी झाले आहेत.त्यांच्यावर बीड येथे उपचार सुरू आहेत.तर मयताचे पारगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले. हा अपघात एवढा भीषण होता की,रस्त्या लागत असलेली झाडे या गाडीच्या धडकेने उन्मळून पडली आहेत तर काही तुटली आहेत.घटनास्थळी वाशी पोलिस स्टेशनमधील पारगाव बिट चे हेड कॉन्स्टेबल राजू लाटे व त्यांच्या पथकांनी भेट देऊन घटनास्थळाचा पंचनामा केला. जखमी इसम लोटस हॉस्पिटल बीड येथे उपचार घेत आहेत पोलीस निरीक्षक थोरात पॉको लाटे सय्यद साठे यादव यांनी घटनास्थळी भेट दिली

------------

## अर्चना कुटेंना अटक करण्याचा

असा थेट सवाल ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक आणि स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांनी प्रशासनाला केला आहे. पोलिस अधीक्षक यांच्याशी चर्चा केल्यानंतर अतिरीक्त पोलिस अधीक्षक सचिन पाडकर यांच्या समावेत बैठक झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विधानभवनात याच प्रकरणावर नुकतीच बैठक पार पडली होती. त्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी तपशीलवार माहिती घेतल्यानंतर सीआयडी आणि बीड पोलिसांना आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्याच अनुषंगाने प्रा. उबाळे यांनी शनिवारी (दि. १९) पोलिस अधीक्षक नवनित कॉवत आणि अति. पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांची भेट घेतली. या बैठकीत प्रा. उबाळे यांनी अर्चना कुटेंचे नातेवाईक एमआयडीसीमधील तिरुमला ऑईल मीलमधून साहित्य चोरत असल्याचा गंभीर आरोप केला. या चोरीतून मिळणाऱ्या रकमा अर्चना कुटेंना पुरवल्या जात आहेत आणि ठेवीदारांचे नाव बदनाम केले जात आहे. पोलिसांनी याचा तपास करावा आणि सत्य बाहेर आणावे'' अशी मागणी उबाळे यांनी पोलिस अधीक्षकांसमोर केली. अर्चना कुटेंना अटक करण्याचा अधिकार फक्त सीआयडीकडे आहे. मग सीआयडी अटक कधी करणार? त्यांच्या प्रॉपर्टीचा लिलाव कधी करणार? आमचं संयम आता संपत चाललं आहे असे प्रा.उबाळे यांनी म्हटले आहे. यावेळी ठेवीदार उपस्थित होते.

**राजस्थानी, साईरामवर एमपीआयडी**

दरम्यान, साईराम घोटाळ्याबाबत एमपीआयडीचा प्रस्ताव त्रुटी पूर्ण करुन नव्याने पुन्हा सादर केला जाणार असून, राजस्थानीचा प्रस्तावास गृहमंत्रालयात प्रलंबित आहे. त्याला अद्याप मंजुरी मिळालेली नाही, अशी माहिती अति. पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी उबाळेंना दिली. मॉ साहेब जिजाऊ मल्टिस्टेटच्या मंजुर एमपीआयडी प्रस्तावात संचालक व नातेवाईक यांच्या प्रॉपर्टीचा समावेश करावा अशी मागणी प्रा.उबाळे यांनी पांडकर यांच्याकडे केली. पुढील टप्प्यात मुख्यमंत्र्यांची पुन्हा भेट घेऊन सर्व घडामोडींचा सविस्तर आढावा मांडणार असल्याची माहितीही प्रा. उबाळेंनी दिली.

---------

## जिल्हा कारागृहातील कैद्याकडे

जणांचे निलंबन तर काही जणांच्या बदल्या सुध्दा झाल्या आहेत. त्यातच जिल्हा कारागृहात असलेल्या एका कैद्याकडे गांजासदृश पदार्थ सापडले असून कारागृहामध्ये अंमली पदार्थांची तस्करी कोण करतंय? याबाबत जोरदार चर्चा सुरु आहे. संबंधित न्यायालयीन बंदीकडून गांजासदृश पदार्थ जप्त करण्यात आला असून, दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत जप्तीची कारवाई आणि पंचनामा करण्यात आला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

------------

## शासनाचा मोठा निर्णय;

केंद्रप्रमुख शिक्षण व्यवस्थेला मिळतील आणि राज्याचा शैक्षणिक दर्जा निश्चितच उंचावेल, अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

**राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या पाठपुराव्याला यश**

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाने मंत्रालयामध्ये ग्रामविकास विभागाशी संपर्क साधून सतत पाठपुरावा केला. प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले व सरचिटणीस संतोष भोजणे यांनी स्वतः मंत्रालयात जाऊन ग्रामविकास विभागाचे नारायण गोरे यांची भेट घेऊन ही बाब लक्षात आणून दिली. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून ग्रामविकास विभागाने केंद्रप्रमुख पदासंदर्भात अधिसूचना जाहीर केली आहे. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने राज्याध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजने, कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण, सुमित पवार, संजय मळभागे, अनंत फुलसुंदर, सुखदेव भालेकर, लक्ष्मण दावणकर, हिरालाल पाटील, लक्ष्मण वडमिले, सचिन गडपतवार, चंद्रशेखर तिखे, विलास काळे शरद वरेकर, लहू राक्षे, रेखा सुडे, राजेंद्र खैरनार, शेवाळे यांनी ग्रामविकास विभागाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

----------------

cmyk

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. २० जुलै २०२५



## थोडक्यात...

### जिल्ह्यातील २० हजार व्यापाऱ्यांना डिजिटल करणार -हस्तीमल बंब



जालना । प्रतिनिधी

शहरातील छ. शिवाजी चौकातील हॉटेल मधुबन च्या सभागृहात ''व्यापारी संघटना आपल्या दारी'' या अभियानातंर्गत व्यापारी महासंघ (कैट)चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तिमल बंब म्हणाले कि, आधुनिक तंत्रज्ञान व टेकनोलॉजीचा वापर आपल्या पारंपारिक व्यवसायात उपयोग काळाची करणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील व्यापाऱ्यांसाठी डिजिटल डिजिटल ऑर्बिट ॲप तयार करण्यात आले आहे. जिल्ह्यातील २० हजार व्यापाऱ्यांना डिजिटल अभियानात समाविष्ट करण्यात येत आहे. प्रत्येकांनी डिजिटल अभियानात नोंदणी करावी.असे आवाहन हस्तीमल बंब यांनी केले. या प्रसंगी हस्तिमल बंब यांचा हस्ते जालना जनरल मर्चन्ट अससोसिएशन ची दिशा निर्देशिकेचे निःशुल्क वितरण करण्यात आले. पुढे त्यांनी सांगितले कि, शहरात प्रत्येक प्रभागात, वार्डात, गल्ली-बोळीत व्यापाऱ्यांना एकजुट संघटित करून प्रत्येक प्रभागात व्यापाऱ्यांची संघटना उभारू, कुठलेही संकट असो किंवा विविध प्रश्न सोडविण्यासाठी व्यापाऱ्यांची एकजूट महत्वाची असून आणि हि निर्देशिका सर्व व्यापाऱ्यांना एका मोतीच्या माळे प्रमाणे संघटित करण्यास मदद करते तसेच सर्व व्यपाऱ्यानी नियमांचे पालन करून निर्भयपणे व्यवसाय करावा, आपण जीवनाच्या अंतिम श्वासा पर्यंत व्यापाऱ्यांसाठी कार्य करत राहणार असे प्रतिपादन व्यापारी महासंघाचे जल्हाध्यक्ष हस्तीमल बंब यांनी केले. या कार्यक्रमाला दैनिक पुढारी चे उपसंपादक अप्पासाहेब खर्डेकर आणी सुदर्शन चिपा, पावन अग्रवाल, सिद्धार्थ काबरा, डिजिटल ऑर्बिट चे मकरंद शहापूरकर, रवी भालकेप्रमुख उपस्थिती व मोठ्या संख्येने व्यापारी उपस्थित होते. पवन अग्रवाल यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

### राजस्थानी विद्यालयात श्रींच्या पालखीचे स्वागत

बीड - पेठ बीड भागातील नावाजलेल्या राजस्थानी सेवा समाज संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाच्या कब बुलबुल पथकाने दिनांक १७ जुलै रोजी शहरात आगमन झालेल्या शेगांव येथील श्री गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत करून दर्शन घेतले. नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असलेली पेठ बीड भागातील नावाजलेली मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाने गुरुवार दिनांक १७ जुलै रोजी पंढरपूरहुन शेगाव कडे निघालेल्या श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे पेठ बीड भागात आगमनावेळी त्यांचे शाळेतील कब बुलबुल पथकाने हात जोडून व वारकरी संप्रदायाची परंपरा असलेले भगवे झेंडे खांद्यावर घेऊन वारकऱ्यांचे स्वागत केले तसेच श्रींच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी विद्यार्थ्यांनी पालखीतील वारकऱ्यांची वेशभूषा त्यांची शिस्तबद्ध राहणीमान व वेळेचे महत्व हे गुण जाणुन घेतले. यावेळी शाळेचे जेष्ठ संचालक राधेश्याम कासट अशोक मंत्री तसेच संतोष सोहनी अमित मंत्री,रामप्रसाद बियाणी विनोद पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप केले.मुख्याध्यापक गिरीष सोहनी यांच्या मार्गदर्शनाखाली व हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक तंबरे सर, कब बुलबुल पथकाचे प्रमुख विनय मंत्री सर, गणेश दोडे सर,पवन लड्डा सर,वैभव बियाणी सर,सौ.घोडके मॅडम,राधेश्याम पारीख विशाल जमदाडे यांनी परीश्रम घेतले.





### अध्यक्षपदी आ.धस समर्थकांची वर्णी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत असलेल्या आष्टी मंडळ कडा मंडळ पाटोदा मंडळ आणि शिरूर मंडळ अध्यक्षांच्या निवडीमध्ये आमदार सुरेश धस यांच्या समर्थकांचीच वर्णी लागली असून त्यांच्या सोशल इंजिनिअरिंग मुळे सर्व समाज घटकांना यामध्ये प्रतिनिधित्व मिळाले आहे भारतीय जनता पार्टीच्या मंडल अध्यक्ष पद नियुक्ती महिन्यापासून प्रतीक्षेमध्येच होत्या मात्र पुन्हा एकदा आष्टी विधानसभा मतदार संघातील तीनही तालुक्यांच्या मंडळ अध्यक्षपदी निवडीवरून आमदार सुरेश धस यांचे वर्चस्व पुन्हा एकदा अबाधित राहिले आहे मुंबई येथे प्रदेश कार्यालयामध्ये आष्टी मंडळ अध्यक्षपदी रमेश गावडे, कडा मंडळ अध्यक्षपदी अनिल ढवळे पाटोदा मंडळ अध्यक्षपदी भागवत येवले आणि शिरूर कासार मंडळ अध्यक्षपदी सुरेश उगलमुगले या नवनिर्वाचित मंडळ अध्यक्षांना सन्मानपत्र सह नियुक्तीपत्र आमदार सुरेश धस यांचे हस्ते सुपूर्द करण्यात आले यावेळी अल्पसंख्यांक आघाडीचे सलीम जहांगीर उपस्थित होते या चारही मंडळ अध्यक्ष पदाच्या निवडीवरून आमदार सुरेश धस यांनी सर्वसाधारण प्रवर्ग इतर मागासवर्गीय प्रवर्ग आणि विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्ग असा सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग केल्यामुळे भारतीय जनता पार्टीमध्ये सर्वांना समान न्याय देण्यात येतो असा संदेश या निवडीद्वारे दिलेला दिसून येत आहे.

### लाडक्या बहिणींवर मेहरबान तर सावित्रीच्या लेकीला वर्षाला फक्त २२० रुपये -दत्ता वाकसे

बीड । प्रतिनिधी

राज्यात एकीकडे लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना महिन्याला दीड हजार रुपये दिले जात आहेत, तर दुसरीकडे ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या दुर्बल घटकातील इयत्ता पहिली ते चौथीतील मुलींना वर्षाला केवळ २२० रुपये उपस्थिती भत्ता दिला जात आहे. लाडक्या बहिणीच्या लाभात वाढ करण्याची वल्गना करण्यात येत आहे. मात्र, सावित्रीच्या लेकींची कुणाला चिंता का नसावी असा प्रश्न मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी उपस्थित केला आहे. या अल्प रकमेच्या भत्त्यामुळे मुलींना शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळते म्हणणे कठीण आहे. सावित्रीच्या लेकीचे शिक्षण हे सरकारच्या धोरणाचा केंद्रबिंदू असला पाहिजे; पण वर्षभरात मिळणाऱ्या फक्त २२० रुपयांमध्ये शैक्षणिक गरजा पूर्ण होणे शक्यच नाही. दप्तर, वह्या, पेन, बूट-सॉक्स यासाठी मुलींना कितीतरी खर्च करावा लागतो. अनेक वेळा या भत्त्याची रक्कम वेळेवर मिळत नाही, तर कधी शाळांना याबाबत माहितीच मिळत नाही.

# रूई गावाची वाटचाल विकासाच्या प्रगतीपथावर -जिल्हाधिकारी



**वडवणी । प्रतिनिधी**

**रूई या गावाला आज मी भेट दिली असता या ठिकाणी असणारे रस्ते, शाळा, ग्रामपंचायत बाधकाम यासह इतर योजना या अत्यंत चागले प्रकारे राबविण्यात आलेल्या आहेत हे दिसुन येते त्यामुळे हे गाव विकासासाठी सक्रिय व प्रगती पथावर आहे असे मत काल शुक्रवार रोजी वडवणी तालुका पहाणी व आढावा बैठक दौर्या वेळी असताना रूई पिपळा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे वेळी बोलताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी व्यक्त केले आहे.**

बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा काल दि. १८ जुलै शुक्रवार रोजी वडवणी तालुक्यात आढावा बैठक व पहाणी दौरा केला यावेळी त्यांनी कुप्पा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे भेट देऊन पाहणी करून आढावा घेतला तसेच यावेळी कुप्पा येथील रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे शेतात जाऊन पाहणी करून भेट दिली त्यानंतर वडवणी तहसील कार्यालयात आढावा बैठक घेतली यावेळी अनेक पदाधिकारी राजकीय नेते नागरिकांनी आपल्या तक्रारीचे लेखी निवेदन दिले त्यानंतर तालुक्यातील रुई पिंपळा या गावाला भेट देऊन गावातील केलेल्या विकास कामाची पाहणी केली यामध्ये गावात केलेल्या रस्ते,ग्रामपंचायत बांधकाम,यासह जिल्हा परिषद शाळा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ग्रामपंचायतच्या सरपंच छायाताई आंधळे, उपसरपंच यांनी ग्रामपंचायतच्या वतीने शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तसेच युवा नेते मयूर आंधळे यांनी ग्रामीण भागाचे प्रतिक असणारे बैलगाडी भेट देऊन सत्कार केला तसेच यावेळी बोलताना जिल्हाधिकारी म्हणाले की ऊस तोडणी कामगार हे कारखान्याला जाण्यापूर्वी नोंदणी करून त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी वस्तीग्रह करण्यात येणार असून तसेच मुलींना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे मुली या देशाची संपत्ती आहे तसेच महिला यांची ही प्रगती झाली पाहिजे तरच गावाचा विकास झाला असे समजले जाते त्याचबरोबर शेतकऱ्यांनी आपले उत्पन्न वाढवण्यासाठी तुतीची लागवड करून रेशीम शेती करण्याची आज काळाची गरज असून यासाठी शासन शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करण्यास तयार आहे त्याचबरोबर दिवाळी घरकुल योजना राबविण्यात येत असून त्यामध्ये दिवाळीपर्यंत १००% घरकुल बांधकाम करण्याचे उद्दिष्ट राबविण्यात येत आहे यासाठी गावातील सरपंच,ग्रामसेवक यांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे असे ते म्हणाले यावेळी त्यांच्यासोबत उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले,तहसीलदार वैभव महेंद्रकर,गटविकास अधिकारी विठ्ठलराव नागरगोजे , सहा.गटविकास अधिकारी पोहनेरकर, शंकरराव आंधळे यासह ग्रामसेवक,तलाठी यासह इतर अनेक जण उपस्थित होते यावेळी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा नेते मयूर आंधळे,उपसरपंच सुधाकर लोंढे यासह ग्रामस्थांनी प्रयत्न केले . यावेळी ग्रामस्थ,शिक्षक, पोलीस कर्मचारी, पत्रकार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सरपंचपदाच्या २.५ वर्षाचा विकास कामाचा लेखाजोखा

आतापर्यंत ४१ विकासकामे पूर्ण.. (एकूण १०० विकासकामे करण्याचा नियोजन), आतापर्यंत ३१ सामजिक उपक्रम राबवले.. (एकूण ५० सामजिक उपक्रम करण्याचा मानस), मागील २८ महिन्यामध्ये जवळपास ४.५ कोटीचे रुपयाचे विकासकामे पूर्ण, गावामध्ये विविध योजनेअंतर्गत जवळपास ८० ते १४० घरकुले मंजूर., तालुक्यामध्ये सर्वात कमी क्राइम रेट रेकॉर्ड.. भांडण व तंटे मुक्त गाव करण्याचा संकल्प..

गावांमध्ये १०० % दारूबंदी लागू..

* आतापर्यंत तालुक्यातील सर्वात मोठी सार्वजनिक यात्रा कुस्ती आयोजित करण्याचा मान * मागच्या वर्षभरात ३ आय.ए.एस. अधिकारी यांचा विकासकामे बघण्यासाठी गावभेट दौरा केला. * आतापर्यंत विविध मान्यवर नेते, लोकप्रतिनिधी, कलाकार, अधिकारी इ.. यांनी भेटी दिल्या. * ग्रामपंचायतीला केलेल्या उत्कृष्ट कार्यामुळे आतापर्यंत विविध ३ पुरस्कारे प्राप्त. * संत गाडगेबाबा ग्रामीण स्वच्छता अभियान २०२४-२५ मध्ये बीड जिल्ह्यातून ३ रा क्रमांक, २०२३-२४ मध्ये वडवणी तालुक्यातून १ ला क्रमांक तर २०२४-२५ स्मार्ट व्हिलेजसाठी

# खेळाडू जीवनात यशस्वी होतो :- माजी आ. भीमराव धोंडे

## सैराटमुळे माझे आयुष्य बदलले अन् धोंडे कॉलेजमुळेच मी घडलो - सैराट फेम सुरेश विश्वकर्मा



**आष्टी । प्रतिनिधी**

**व्यायामाला आणि खेळाला जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे विद्यार्थ्यांनी आतापासूनच वेगवेगळे खेळ खेळले पाहिजेत. खेळाडू जीवनात यशस्वी होतो असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले तर आनंदराव धोंडे महाविद्यालयात मी शिकलो या कॉलेजमुळेच माझे जीवन घडले, मी टीव्हीवरील मालिका आणि चित्रपटात काम करू शकलो ते फक्त धोंडे महाविद्यालयाच्या रंगमंचामुळेच असे मत सिनेअभिनेता सुरेश विश्वकर्मा यांनी व्यक्त केले.**

कडा येथील बाबाजी संकुलामध्ये माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १९ ते २१ जुलै अशा तीन दिवसांच्या भव्य क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन सिनेअभिनेता सुरेश विश्वकर्मा यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. भीमराव धोंडे होते. याप्रसंगी व्यासपीठावर युवा नेते अजय दादा धोंडे, अभयराजे धोंडे, गीतकार संजय नवगिरे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, चेअरमन राजेश धोंडे, सरपंच भीमराव पाटील,राजाबापु नलावडे, टिव्ही कलाकार सागर पंडागळे, सरपंच दादासाहेब जगताप, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, डॉ. गांजुरे, रिपाईचे अध्यक्ष अशोक साळवे, चेअरमन दादासाहेब हजारे, हभप पांडुरंग कर्डीले महाराज, हरिभाऊ जंजिरे, बजरंग कर्डीले, प्राचार्य डॉ. सुर्यकांत धोंडे, विठ्ठल लांडगे, सोनाजी गांजुरे, प्राचार्य भगवान वाघुले, पत्रकार उत्तम बोडखे, गोवर्धन जाधव, शहादेव खेडकर, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.डी.बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, सागर वाघुले, संदीप ननवरे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. अशोक गदादे, प्राचार्य डॉ. संजय धोंडे, प्राचार्य दादासाहेब काळे, मुख्याध्यापक संजय कोथमिरे व इतर मान्यवर उपस्थित होते. क्रिडा महोत्सवाच्या निमित्ताने प्रारंभी कडा शहरातून ३ हजार ७०० खेळाडूंची भव्य अशी रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी क्रिडा स्पर्धांचे महत्त्व सांगितले. पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की, खेळामध्ये हार जित होतच असते. पराभव झाला तरी कोणी विद्यार्थ्यांनी कमीपणा समजू नये सतत सराव करीत रहा. सराव केल्याने यश निश्चित मिळते. खेळामुळे सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. खेळ खेळणारा माणूस जीवनात निश्चित यशस्वी होतो. सिनेअभिनेता व सैराट फेम सुरेश विश्वकर्मा यांनी सांगितले की, मी या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे याचा मला खूप अभिमान आहे. आज ज्या स्टेजवरून मी बोलतोय या स्टेजवर मी घडलो, याच ठिकाणी नाटक, एकांकिका केल्या, अभिनय शिकलो आणि मी विद्यापीठ पातळीवर पोहोचलो. त्यामुळेच माझे भविष्य उज्वल झाले आज याच रंगमंचामुळे मी टीव्ही मालिका आणि चित्रपटांमध्ये काम करीत आहे. खेळाडूंनी खूप प्रॅक्टिस करून खेळ खेळावे, मोठे व्हावे यश संपादन करावे आणि आपल्या आई वडिलांचे आणि शाळेचे नावलौकिक करावे. जीवनात शरीर संपत्ती ही महत्त्वाची आहे त्यामुळे खेळाला महत्त्व द्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर खेळाला महत्त्व आहेच. सैराट चित्रपटांमुळे माझे आयुष्य बदलले, त्या चित्रपटामुळेच मी घराघरात आणि लोकांच्या मनामनात पोहोचलो. यावेळी विश्वकर्मा यांनी सैराट चित्रपटातील संवाद ऐकूण विद्यार्थ्यांना प्रचंड खुश केले. गीतकार संजय नवगिरे व इतरांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. बापु खैरे व प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ. भास्कर चव्हाण यांनी मानले.

# नाही रे वर्गासाठी सदैव कार्यरत राहणे गरजेचे -प्राचार्य डी.जी. तांदळे



**बीड । प्रतिनिधी**

शिक्षक नेते तसेच विविध संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात पुढाकार घेणारे,बीड शहर बचाव मंच परिवाराचे मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे सरांचा ७० वा वाढदिवस बीड शहर बजावा मंच व मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने दि. १७ जुलै २०२५ रोजी शहरातील भाजी मंडई येथील बेघरांच्या जिव्हाळा केंद्रात विविध सामाजिक संघटनांचे राजकीय पक्षांचे प्रमुखांच्या तसेच अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शहरातील विविध क्षेत्रातील यशस्वीपणे कार्य करणाऱ्या मान्यवरांकडून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी प्राचार्य डी.जी. तांदळे सरांनी सत्कारा निमित्त आभार व्यक्त करताना, आपण सर्वजण गाडगे बाबांचे जमेल तितकं तरी कार्य करूया. उपाशी आहेत त्यांना अन्न ,उघडे आहेत त्यांना वस्त्र ,आरोग्य ,शिक्षण, निवारा देण्याचा प्रयत्न आपण सर्वजण मिळून करूया निदान सहकार्य तरी करूया .नाही रे वर्गासाठी आपण सर्वजण मिळून कार्यरत राहून वंचितांना ,बेघरांना मदतीचा हात देऊया असे मत डी.जी.तांदळे सर यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमात नुकतेच सेवानिवृत्त झालेले पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब जायभाये,शिवाजी भारती, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवाजी चौधरी, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अभियंता सुभाष चाटे ,जिल्हा परिषदेचे आदर्श शिक्षक अनिल जाधवर, समाजसेवक मुकरमजान पठाण, परवेज भाई कुरेशी ,पत्रकार शेख इब्रोंज आदींना मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. अनिल बारगजे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, सूत्रसंचालन मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी केले.

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### झाडे लावा झाडांचे संगोपन

पाटील,शिवाजी पठाडे,काका काकडे,योगेश चौधरी,महेश पोतदार,भरत गायकवाड यांचा समावेश होता. पुढे बोलताना डख म्हणाले की,पुढील आठवड्यात राज्यात जोरदार पाऊस पडणार असून २५ जुलै पर्यंत आष्टी तालुक्यात समाधानकारक पाऊस पडणार आहे.डख यांनी निसर्गाचे अनेक संकेत उपस्थित शेतकरी वर्गांना समजावून सांगत आपण हवामानाचा अंदाज कसा काढतो हे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. भविष्यात देश व राज्य प्रदूषणाचा बळी पडणार असून यामुळे वातावरणात मोठ्या प्रमाणावर बदल घडवून येत आहे, हे मानवी जीवनासाठी धोक्याची घंटा आहे.अमाप अशी होणारी वृक्षतोड मानवी जीवनाला संपुष्टात आणील.

यावर वेळीच आवर घालून प्रत्येकाने पर्यावरणचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे सचिव हेमांतकुमार पोखरणा यांनी सांगितले की, अमोलक संस्थेने यावर्षी शंभर वर्षे पूर्ण केले आहेत. संस्था सामाजिक बांधिलकी म्हणून विविध प्रकारचे उपक्रम राबविले आहेत.यापुढेही संस्था असेच सामाजिक उपक्रम राबविणार असल्याची ग्वाही दिली. यावेळी हितेश जामदार,दिलीप पटवा,रमेश खरमाळे,मोटार परिवहन अधिकारी अविनाश दळवी यांनी विचार मांडले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जवाहरलाल भंडारी यांनी केले. यावेळी केडगाव चौफुला येथील व्यापारी प्रशांत मुथा यांनी या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ५०० वृक्ष भेट देण्याची कबूल करून येणाऱ्या वर्षात जो कोणी विद्यार्थी जास्त चांगल्या प्रकारे झाडाचे संगोपन करील त्याला येतोच बक्षीस देण्याचे चानोदिया शेठ यांनी सांगितले. या कार्यक्रमाचा समारोप अमोलक जैन संस्थेचे अध्यक्ष हेमंत शेठ पोखरणा यांनी केले. या संस्थेचे सदस्य डॉ पटवा यांनी पंजाबराव डक यांचे अमाविक हवामानाविषयी असलेल्या अभ्यासाचे कौतुक करून आता आपण इतर हवामान अभ्यासक तयार करावे याची कार्यशाळा घ्याव्यात अशी इच्छा व्यक्त केली.

### वालुमाफीयाची हर्सुलला

अधीक्षक नवनीत काँवत यांच्या चानाक्ष नजरेतुन लपवुन राहीली नाही. त्यांनी संदीप पाटील स.पो.नि चकलांबा व शिवाजी बंटेवाड

दिनांक १८.०७.२०२५ रोजी शिवाजी बंटेवाड पोनि स्थागुशा, बीड यांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीलायक बातमी मिळाली की, सदर इसम हा पैठण तालूक्यात चोरुन लपुन वावरत आहे. त्यावरुन पोनि स्थागुशा, बीड यांनी पोउपनि सिद्धेश्वर मुरकुटे स्थागुशा, बीड यांचे पथक रवाना केले.सदरच्या इसमास पथकाने दि. १८.०७.२०२५ रोजी मुंगी फाटा येथे ताब्यात घेवुन पोलीस ठाणे चकलांबा येथे दि. १८.०७.२०२५ रोजी २०.२५ वा हजर केले व त्यानंतर योग्य पोलीस बंदोबस्तात स.पो.नि चकलांबा यांनी ताबे पोलीस अंमलदारा मार्फत हसुंलकारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १९.०७.२०२५ रोजी ०१.१५ वा. हजर करुन स्थानबध्द केले आहे.

### टिपरे, सोंग आणि भोलोबा

बक्षिसांचा वर्षाव यासाठी केला जातो. टिपरे महोत्सवाच्या आयोजना संदर्भात साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी लोकशाहीरांना अभिवादन केल्यानंतर गढी येथे झालेल्या दुर्दैवी अपघातील मृत तरुणांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. ज्येष्ठ कलावंत ॲड. सुभाष निकम यांचा सत्कारही या बैठकीत करण्यात आला. बैठकीला शाहीर विलास सोनवणे, ज्येष्ठ कलावंत प्रशांत रुईकर, विष्णूपंत खेत्रे, संघ प्रतिनिधी महेश मोटे, दत्ता दाभाडे, अक्षय पवार यांच्यासह आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

### निर्धार नवपर्वाचा-पदाधिकारी

होत असल्याने जिल्हाभरातून कार्यकर्ते येणार आहेत. स्व.यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हा सोहळा संपन्न होत आहे. मागील दोन दिवसांपासून या मेळाव्याची जय्यत तयारी देखील सुरू आहे. पदाधिकाऱ्यांना मेळाव्यातून नवीन उर्जा आणि बळ मिळणार असल्याने पदाधिकारीही या मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. दरम्यान, या मेळाव्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आजी-माजी आमदार, प्रदेश पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, महिला, युवक युवती, फ्रंटल सेलचे अध्यक्ष व कार्यकारणी तसेच जिल्हा कार्यकारणी, जि.प.व प.स.सदस्य, आजी माजी नगराध्यक्ष, नगरसेवक, से.स.सो.चेअरमन, सरपंच,ग्रा.प.सदस्य, बाजार समिती सभापती-संचालक तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने या मेळाव्यास उपस्थित रहावे, असे अवाहन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, युवा नेते बळीराम गवते यांनी केले आहे.

### राजस्थानी गणेश मंडळच्या

आगामी काळात मंडळाच्या वतीने अधिकाधिक समाजोपयोगी उपक्रम हाती घेतले जातील.'' सचिव तिलक चरखा यांनी सांगितले, ''मंडळाच्या परंपरा अधिक भव्य व लोकसहभागातून साजरा केला जाईल.'' कार्यक्रमास मंडळाचे सर्व पदाधिकारी, ज्येष्ठ सदस्य, माजी अध्यक्ष, गणेशभक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करत भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### टी.सी.हरवला आहे

सनी सुनिल कांबळे रा. लालवाडी ता.अंबड जि.जालना याची जनजागृती विद्यालय शेवगा ता. अंबड जि. जालना या शाळेची १० वी पासची टीसी प्रवासा दरम्यान हरवली आहे तरी सापडल्यास या ८२६१९९८२८३ क्रमांकावर संपर्क साधावा.

# ६०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण करत अंबाजोगाई पिपल्स बँकेची गरुडझेप

## ग्राहकांच्या विश्वासार्हतेच्या बळावरच बँकेची यशस्वी कामगिरी - चेअरमन राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई पिपल्स को-ऑप सहकारी बँकेने ग्राहकांना दर्जेदार बँकींग सेवा देत ६०० कोटी रुपये ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. नुकतेच बँकेच्या सर्वोत्तम एनपीए व्यवस्थापनामुळे शहरी सहकारी बँक गटात भारतरत्न सहकारिता पुरस्कार २०२५ ने ही गौरवविण्यात आले आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेने पारदर्शक, गतिमान कारभार व तत्पर सेवेला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळे नेहमीच उत्तम टीमवर्क करून बँकेने सभासद, ठेविदार, ग्राहक आणि हितचिंतक यांची विश्वासार्हता कमावली असल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले आहे की, चालू आर्थिक वर्षामध्ये बँकेने ६०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या प्रगतीचा आलेख आजतागायत उंचावलेला असून नुकतेच २४ मे २०२५ रोजी बँकेच्या स्थापनेस २९ वर्षे पूर्ण झाली आहेत. सामाजिक बांधिलकीतून पिपल्स बँक आज बँकींग क्षेत्रात कार्यरत आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागात बँकेच्या मुख्य शाखा व दोन विस्तारीत शाखांसह एकूण १८ शाखा कार्यरत आहेत. संपूर्ण महाराष्ट्र हे बँकेचे कार्यक्षेत्र आहे. बँकेच्या सर्व शाखा या संगणकीकृत आहेत. यूपीआय ही सुविधा देणारी अंबाजोगाई पीपल्स बँक ही शहरातील पहिली नागरी बँक ठरली आहे. बँकेकडे स्वतःचे अत्याधुनिक डाटा सेंटर आहे. तत्पर, विनम्र आणि दर्जेदार बँकींग सेवा ही बँकेची ओळख आहे. बँकेस तीन नव्या शाखांना भारतीय रिझर्व बँकेकडून मंजूरी मिळाली आहे.यामध्ये मुरूड, (जि. लातूर) केज, (जि. बीड), निलंगा (जि. लातूर) येथे मंजुरी मिळालेल्या बँकेच्या शाखा कार्यन्वीत होणार आहेत. बँकेकडून नव्यानेच आधारबेस पेमेंट सुविधा सुरू करण्यात आलेली आहे. यामध्ये लाडकी बहीन योजना, गॅस सबसीडी, पीएम किसान सन्मान योजना यासारख्या शासनाकडून मिळणा-या विविध योजनांमधून मिळणारी रक्कम ग्राहकांच्या खात्यात थेट जमा केली जाते. बँकेच्या कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त ग्राहकांना रोख रक्कम बँकेत जमा करता यावी यासाठी बँकेने आपल्या अंबाजोगाई शहरात रक्कम भरणा व काढणे मशीनची सुविधा सुरू केली आहे. अंबाजोगाई शहरामध्ये अशा प्रकारची सुविधा देणारी आपली अंबाजोगाई पिपल्स को.ऑप. बँक ही पहिलीच नागरी बँक ठरली आहे. ३० जुन २०२५ अखेर बँकेची सभासद संख्या १२६८५एवढी असून बँकेकडे ६०३ कोटीच्या ठेवी आहेत. बँकेचे भागभांडवल १९ कोटी, तर स्वनिधी हा ४८ कोटी एवढा आहे. बँकेने तब्बल ३२५ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करत ३३० कोटी रूपयांची गुंतवणूकही केली आहे. बँकेला ३१ मार्च २०२५ अखेर ४ कोटी ७२ लाख रुपयांचा नफा झाला आहे. बँकेने आपल्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण वर्षभर विविध सामाजिक, विधायक आणि लोकोपयोगी उपक्रम राबविले होते हे उल्लेखनीय आहे. अंबाजोगाई पीपल्स बँकेने गरूडझेप घेत ६०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. पिपल्स बँक ही केंद्र सरकार, आरबीआय, सहकार खाते आणि बँकींगचे सर्व नियम पाळून समाजातील शेवटच्या घटकांपर्यत बँकींग सेवा सर्व सुविधासह उपलब्ध करून देत आहे. आर्थिक वर्षात आपला एनपीए शुन्य टक्के ठेवण्याचा किंवा कमीत-कमी राखण्यासाठी काटेकोरपणे काम करीत बँकेकडून एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले जाते. याच सर्वोत्तम व्यवस्थापनाची दखल घेत आशिया खंडातील सहकारी बँकिंगसाठी सर्वात मोठे व्यासपीठ असलेले भारत कॉपरेटीव्ह बँकिंग समितीच्या वतीने नुकतेच अंबाजोगाई पीपल्स बँकेला एनपीएचे सर्वोत्तम व्यवस्थापन करणारी शहरी सहकारी बँक या गटात भारतरत्न सहकारिता पुरस्कार देवून गौरविण्यात आले असल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी अभिमानाने सांगितले. पुढे बोलताना राजकिशोर मोदी यांनी नमूद केले की बँकेच्या सर्वच शाखांतून बँकेमार्फत ग्राहकांना इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एईपीएस, तसेच युपीआय सारख्या अद्ययावत सुविधा देखील पुरविण्यात येत आहेत. बँकींग विषयक सर्व आधुनिक सेवा, सुविधा, नवे तंत्रज्ञान, डिजिटल व्यवहार बँक सभासद आणि ग्राहकांना पुरविते. यापूर्वी ही बँकेस विविध सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ज्यामध्ये बँकिंग फ्रंटीयर्स यांचा ''बेस्ट ब्रँच एक्सपानशन पुरस्कार'', अविज पब्लिकेशन कोल्हापूर यांचा उत्कृष्ट बँक व्यवस्थापन व तंत्रज्ञान श्रेणीत '' बँको पुरस्कार'' , पुणे जिल्हा बँक्स असोसिएशनचा ''उत्कृष्ट एन पी ए व्यवस्थापन पुरस्कार'' या पुरस्कारांचा समावेश आहे.




cmyk

# शेतकऱ्यांना मोबाईलवरच मिळणार ४१ पिकांवरील किड व रोगांची अचूक माहिती

## महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे शेतकऱ्यांसाठी ॲप

अहिल्यानगर : शेती क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. बहुतांश शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन आला आहे. त्यामुळे बदलत्या काळाची गरज ओळखून राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने सेंटर ऑफ एक्सेलेन्स- स्मार्ट व काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान फुले स्मार्ट पीडीएम मोबाईल ॲप विकसित केलं आहे. या ॲपच्या मदतीने शेतकऱ्यांना पिकानिहाय कीड व रोग ओळख आणि व्यवस्थापनाची शिफारसीची माहिती मिळणार आहे.

ॲपचे वैशिष्ट्ये काय? : विद्यापीठाने विकसित केलेल्या या ॲपचा फायदा शेतकरी, कृषी विद्यार्थी आणि संशोधकांना होणार आहे. या ॲपमध्ये पिकांनुसार माहिती आणि सोपी मांडणी करण्यात आलेली आहे. तसेच कीड रोगांची लक्षणे आणि प्रतिमा यावर आधारित ओळख देण्यात आली आहे. तर कीटकनाशक व बुरशीनाशकाची शिफारस करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या ॲपवरील माहिती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येणार असून त्यामुळे शेतकऱ्यांना अद्ययावत माहिती मिळणार आहे, असे कृषी विद्यापीठाने सांगितले आहे. या ॲपमधील माहिती मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह विद्यार्थी आणि संशोधकांना फायदा



घेता येणार आहे.

कोणत्या पिकांची माहिती? : शेतकऱ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून ॲप डाउनलोड करण्यासाठी या https://play.google.com/store/apps/details?id=com.mpkv.ppdm लिंकचा वापर करावा. मोबाईलमध्ये ॲप डाऊनलोड करून इंस्टोल करावं. इंस्टोल केल्यानंतर ॲप ओपन करून स्क्रीनवर उजव्या कोपऱ्यात वरच्या बाजूला भाषेचा पर्याय निवडता येतो. तर खालील बाजूला होम, कीटकनाशक आणि बुरशीनाशक आणि अधिक असे चार पर्याय देण्यात आले आहेत. होम यावर क्लिक केल्यानंतर तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य, नगदी पिके, भाजीपाला आणि फळ पिके अशी वर्गीकरण दिसेल.

तृणधान्य : तृणधान्यामध्ये भात, बाजरी, गहू, मका, ज्वारी, सातू पिकांवरील कीटक आणि रोगांची लक्षणे, प्रतिमा आणि व्यस्थापनाची माहिती देण्यात आली आहे. कडधान्यामध्ये हरभरा, तूर, मूग आणि उडीद, गळीतधान्यांमध्ये भुईमुग, सोयाबीन, सूर्यफुल, करडई, तीळ, तर नगदी पिकांमाध्ये ऊस आणि कापूस या पिकांवरील कीड व रोगांच्या लक्षणे, प्रतिमा आणि उपाययोजना देण्यात आले आहे.

भाजीपाला : तसेच भाजीपाला पिकांमध्ये कांदा, मिरची, टोमॅटो, भेंडी, वांगी, हळद, आले, वाटाणा, काकडी, कोबी, फुलकोबी, बटाटा आणि कारले तर फळ पिकांमध्ये आंबा, केळी, डाळींब, द्राक्ष, पेरू, पपई, कागदी लिंबू, संत्री, मोसंबी, नारळ आणि टरबूज पिकांवरील कीड आणि रोगाची लक्षणे, प्रतिमा आणि व्यवस्थापनाची माहिती देण्यात आली आहे. वरील सर्व पिकांमध्ये कोणती किडरोगांचा प्रादुर्भाव झाला आहे, त्यासाठी कोणती उपाययोजना कराव्यात, याची माहिती शेतकऱ्यांना सहज मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांना अद्ययावत आणि अचूक मार्गदर्शन मोबाईल ॲपवरच उपलब्ध झाले आहे.

# गाजरगवत या तणाचे नियंत्रण करण्याची पद्धत

तणांचे नियंत्रण शेतीतील एक अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे, कारण तणांचा प्रकोप पीकांच्या उत्पादनावर मोठा परिणाम करू शकतो. गाजर गवत एक अत्यंत त्रासदायक तण आहे, जे अनेक पिकांमध्ये आढळते. हे तण तोंड उचलल्यावर, ते सहजतेने पिकांच्या अन्नाचे पोषण चोरण्याच कारण बनते, ज्यामुळे पिकांची गुणवत्ता आणि उत्पादन कमी होते. यासाठी गाजर गवताच वेळेवर आणि प्रभावी नियंत्रण अत्यंत आवश्यक आहे. गाजर गवताच्या नियंत्रणासाठी तीन प्रमुख उपाययोजना आहेत: प्रतिबंधात्मक, निवारणात्मक आणि निर्मुलनात्मक.



गाजरगवत प्रतिबंधात्मक उपाय : हे तण फुलावर येण्यापुर्वी मुळासकट उपटुन काढावे. कंपोस्टचे खड्डे, ओलिताचे दांड, कालवे, रेल्वे लाईन, रस्ते इत्यादी ठिकाणी गाजर गवत फुलावर येण्यापुर्वी उपटावे.


गाजरगवत निवारणात्मक उपाय : या उपायामध्ये गाजर गवताच्या वाढीला आळा घालण्यासाठी पिकांमध्ये निंदणी किंवा कोळपणी करणे आवश्यक आहे. जर तणांचा प्रकोप फारच वाढला असेल, तर योग्य तणनाशकांचा वापर केला जातो. या तणनाशकांना खूप काळजीपूर्वक वापरणे आवश्यक आहे, कारण योग्य प्रमाणात न वापरणे आपल्या पिकांना हानी पोहोचवू शकते. यासाठी २, ४-डी हे तणनाशक (सोडियम क्षार) ३ किलो किंवा ग्लायफोसेट ५ लिटर ५०० लिटर पाण्यात मिसळुन हे तण फुलावर येण्यापुर्वी फवारावे. गरज भासल्यास परत १० ते १५ दिवसांनी त्याच प्रमाणात फवारणी करावी.

गाजरगवत निर्मुलनात्मक उपाय : निर्मुलनात्मक उपायांमध्ये गाजर गवताचे पुन्हा पुन्हा काढून टाकणे आवश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित शेतकरी आणि संस्थांनी एकत्र येऊन गाजर गवताचे नियमितपणे नियंत्रण केले पाहिजे.

शेतकऱ्यांनी, जर गाजर गवताचे नियमितपणे नियंत्रण केले नाही, तर त्याचा मोठा परिणाम आपल्या पीकावर होऊ शकतो.त्यासाठी प्रतिबंधात्मक, निवारणात्मक, आणि निर्मुलनात्मक उपायांची आवश्यकता आहे.

# लाळ्या खुरकूत रोगाची लक्षणे आणि उपाय

शेतीला जोडधंधा म्हणून पशूपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो. त्यामूळे शेतकऱ्यांना दूध व्यवसायातून चांगला नफा मिळतो. पण जनावरांचे आरोग्य चांगले असेल तर त्यांच्यापासून चांगल्या प्रतीचे दूध उत्पादन मिळते. म्हणून जनावरांच्या आरोग्याची काळजी घेणे फार गरजेचे असते. हिवाळ्यात जनावरांना लाळ्या खुरकूत आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळत आहे. हा संसर्गजन्य रोग असून प्रामुख्याने डिसेंबर पासून ते जून महिन्यापर्यंत होण्याचे प्रमाण जास्त असते.



शेतीला जोडधंधा म्हणून पशूपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो. त्यामूळे शेतकऱ्यांना दूध व्यवसायातून चांगला नफा मिळतो. पण जनावरांचे आरोग्य चांगले असेल तर त्यांच्यापासून चांगल्या प्रतीचे दूध उत्पादन मिळते. म्हणून जनावरांच्या आरोग्याची काळजी घेणे फार गरजेचे असते. हिवाळ्यात जनावरांना लाळ्या खुरकूत आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळत आहे. हा संसर्गजन्य रोग असून प्रामुख्याने डिसेंबर पासून ते जून महिन्यापर्यंत होण्याचे प्रमाण जास्त असते. ज्या जनावरांची खूर विभागलेली असते अशा जनावरांना हा आजार जास्त होतो.या रोगाचा प्रसार लाळेतून होत असतो.


रोगाची लक्षणे : या रोगाची लागण झाल्यास जनावरे खाणे-पिणे कमी होते. जनावरांना ताप येतो, शरीरात उच्च तापमान तसेच तोंड,सड,खुराच्या मधून स्त्राव येत राहतो.दूध उत्पादनात घट होते. दूध उत्पादनक्षमता कायमची नष्ट होण्याचे प्रमाण वाढते. जनावराच्या जिभेवर, टाळूवर व तोंडाच्या आतील भागात फोड येतात.शरीरात थकवा जाणवतो अशक्तपणा येतो. जनावरांना खुरांतील मोकळ्या भागामध्ये फोड येतात. या रोगाची लागण झालेले जनावर पाय सारखे झटकत असते.उपाय : रोगी जनावरांनी खाल्लेला चारा इतर जनावरांना देऊ नये. रोगट जनावरांना पाण्याची व्यवस्थाही वेगळ्या ठिकाणी करावी. रोगट जनावरांना जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळे ठेवावे. रोगग्रस्त जनावरांचा गोठा रोज जंतुनाशकाने धुवावा. माशा, कीटक यांच्यावर नियंत्रण ठेवावे. जनावरांचे लसीकरण केल्यास या रोगाची लागन होत नाही.

# मराठवाड्यातील हवामानाचं बदलतं गणित; शेतकऱ्यांच्या जगण्याची परीक्षा

मराठवाड्याचा शेतकरी आणि त्याचं जीवन गेल्या काही वर्षांपासून हवामानाच्या तडाख्यात अडकलेलं आहे. एकेकाळी जून महिन्यात थेट पेरणीला हात घालणारा शेतकरी आज जुलै-ऑगस्ट उजाडेपर्यंत आभाळाकडे डोळे लावून बसतो आहे. यावर्षीही हाच अनुभव पुन्हा आला आहे. पावसाची अनिश्चितता, कधी अतीवृष्टी तर कधी पूर्ण कोरडा काळ, यामुळे मराठवाड्यातील शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे. शेती हा व्यवसाय नसून जगण्याचा श्वास मानणाऱ्या शेतकऱ्याला हवामानानेच प्रश्नांकित केलं आहे.

या भागात पूर्वी ठरावीक ऋतूच्या वेळेस येणारा पाऊस आता काळच चुकवत आहे. जूनमध्ये अपेक्षित असलेला पाऊस जुलैमध्येही लागत नाही, आणि जर लागलाच तर काही भागांत एकाच वेळी मुसळधार होऊन नुकसान करून जातो. एखाद्या भागात पावसाची हजेरी लागत नाहीच. यामुळे खरिपाच्या पेरण्या वाया जातात. काही शेतकरी दुबार, तिबार पेरण्या करत असतात, परंतु त्यातून आर्थिक ओढाताण वाढते. यावर्षीही मराठवाड्यात अनेक ठिकाणी बी टाकल्यानंतर ते उगवलेच नाही, किंवा उगवले तरी वाळून गेले, अशा तक्रारी ठिकठिकाणी ऐकायला मिळाल्या.

हवामानाच्या या अस्थिरतेसोबतच वाढतं तापमान देखील शेतकऱ्याच्या अडचणी वाढवत आहे. एप्रिल-मे महिन्यांतील ४० ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेलेलं तापमान जून आणि जुलैमध्येही कमी होत नाही. त्यामुळे जमिनीत ओल टिकत नाही. पेरणी केलेली बियाणं उगम धरण्याआधीच कोरडी पडतात. काही वेळेस तर पेरणी झाल्यानंतर वादळ, जोरदार वारा किंवा अचानक पडलेला पाऊस बी-रोप वाहून नेतो.



शेतकऱ्याच्या मेहनतीवर आणि खर्चावर अक्षरशः पाणी फिरतं.

या सगळ्या बदलाचा थेट परिणाम शेतकऱ्याच्या अर्थकारणावर होत आहे. एकदा पेरणी वाया गेली की पुन्हा बियाणं, खतं, मशागत यासाठी पैसे उधारीवर काढावे लागतात. कर्जाचा डोंगर वाढत जातो आणि त्यामुळे शेतकऱ्याचं आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडतं. या आर्थिक संकटातूनच बऱ्याचदा शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेताना दिसतो. सिंचनाचाही प्रश्न तितकाच गंभीर आहे. पावसावर अवलंबून असलेल्या मराठवाड्यातील तलाव, विहिरी, बंधारे वर्षानुवर्षे कोरडे पडतात. उपलब्ध पाणीसाठे दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. सरकारी योजना आणि सिंचन प्रकल्पांची घोषणाही होते पण त्याची अंमलबजावणी आणि लाभ मिळण्यात शेतकऱ्याला अनेक अडचणींना सामोरं जावं लागतं. म्हणूनच या सगळ्या परिस्थितीकडे केवळ तक्रारीच्या नजरेने न पाहता काही वास्तववादी उपाय शोधणं आज गरजेचं आहे. पाऊस आणि हवामान यांच्यावर शेतकऱ्याचं नियंत्रण नाही, पण या बदलांना सामोरे जाण्याचे काही मार्ग नक्कीच आहेत. कमी पाण्यावर तग धरू शकणाऱ्या आणि कमी कालावधीत येणाऱ्या पिकांची निवड करणे शेतकऱ्याच्या हिताचं आहे. ज्वारी, बाजरी, तूर, हरभरा यांसारखी स्थानिक हवामानाशी सुसंगत पिकं घेतल्यास धोका काही प्रमाणात कमी होतो.

एकाच पिकावर अवलंबून राहण्याऐवजी पीक विविधीकरण करून उत्पादनाचं आणि उत्पन्नाचं धोरण तयार करणं गरजेचं आहे. एका शेतात दोन-तीन प्रकारची पिकं घेतल्यास हवामानाचा फटका सर्व पिकांवर एकाचवेळी बसत नाही आणि शेतकऱ्याला थोडाफार आर्थिक आधार मिळू शकतो. सेंद्रिय घटकांचा वापर वाढवल्यास जमिनीत ओल टिकण्यास मदत होते, खतांचा खर्च कमी होतो आणि दीर्घकालीन उत्पादनशक्ती टिकते. त्यामुळे सेंद्रिय शेतीच्या दिशेने पावलं उचलणं हाच एक शाश्वत मार्ग होऊ शकतो. जलसंधारण आणि पाण्याचं नियोजन हाच शेवटचा आणि महत्वाचा उपाय आहे. शेततळ्यांची निर्मिती, विहिरींची पुनर्भरण क्षमता वाढवणं, बांधबंदिस्ती यांसारख्या पारंपरिक पद्धतींचा वापर केल्यास शेतकऱ्याच्या हाती पाण्याचा



**डॉ. भागवत राजाभाऊ चव्हाण**
कृषी वनस्पतीशास्त्राचे अभ्यासक
मो.८७६७४५६४५५

ठसा टिकू शकतो. यासाठी सरकारी योजनेचा उपयोग करणे आणि स्थानिक संस्थांशी समन्वय साधणे आवश्यक आहे.

हवामान विभाग, कृषी विज्ञान केंद्रे आणि कृषी विद्यापीठांकडून मिळणाऱ्या हवामान आधारित सल्ल्याचा उपयोग करून शेतीचे नियोजन करणे, बदलत्या हवामान परिस्थितीत मार्गदर्शक ठरू शकते. मराठवाड्यातील हवामानाचं बदलतं चित्र हे केवळ आकड्यांमधलं किंवा चर्चेचं प्रकरण नाही, तर शेतकऱ्याच्या दैनंदिन आयुष्याचा भाग आहे. या संकटाकडे हताशपणे पाहण्याऐवजी त्याला तोंड देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणं हाच खरा मार्ग आहे. परिस्थिती कठीण आहे, हे वास्तव स्वीकारून त्यावर काम केल्याशिवाय पर्याय नाही. कारण शेती आणि शेतकरी वाचला तरच मराठवाडा वाचेल आणि मराठवाड्याचं भविष्य टिकेल.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३७ : व्हिक्टोरिया इंग्लंडच्या राणीपदी
१८४० : सॅम्युअल मोर्स यांना टेलिग्राफ चा पेटंट मिळाला.
१८६३ : वेस्ट व्हर्जिनिया अमेरिकेचे ३५ वे राज्य बनले.
१८७७ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांनी कॅनडा मध्ये जगातील पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरवात केली.
१८८७ : देशातील सर्वाधिक गर्दीचे स्टेशन व्हिक्टोरिया टर्मिनस (सध्याचे नाव सी. एस. टी.) सुरू झाले.
१८९९ : केंब्रिज विद्यापीठाच्या 'ट्रायपॉस' या गणिताच्या अंतिम परीक्षेत रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे पहिल्या वर्गात पहिले आल्यामुळे त्यांना सिनिअर रँग्लर होण्याचा बहुमान मिळाला.
१९२१ : टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना
१९६० : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापना
१९९० : ७.४ मेगावॅटचा भूकंपात इराण मध्ये ५०,००० लोक ठार तर १,५०,००० पर्यंत जखमी झाले.
१९९७ : 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'तर्फे राज्यातील पहिली मुलींची सैनिकी शाळा पुण्याजवळ सुरू झाली.
२००१ : परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झाले.
२०१४ : प्रसिद्ध कवी केदारनाथ सिंह यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : प्रसिद्ध ब्रिटीश व्यापारी व राजकारणी सर एडवर्ड अल्बर्ट ससून यांचा जन्मदिन.
१८६९ : लक्ष्मणराव किर्लोस्कर किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९५६)
१८७६ : भारतीय तेलगु भाषिक चित्रपट क्षेत्राच्या इतिहासातील प्रसिद्ध पहिले गीतकार चांदला केसावदासू यांचा जन्मदिन.
१९१५ : टेरेन्स यंग चिनी-इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९४)
१९२० : मनमोहन अधिकारी लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान, कम्युनिस्ट नेते (मृत्यू: २६ एप्रिल १९९९)
१९३९ : रमाकांत देसाई जलदगती गोलंदाज व राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष (मृत्यू: २८ एप्रिल १९९८)
१९४८ : नौरूचे राष्ट्राध्यक्ष लुडविग स्कॉटी यांचा जन्म.
१९५२ : भारतीय लेखक आणि कवी विक्रम सेठ यांचा जन्म.
१९५४ : ॲलन लॅम्ब इंग्लिश क्रिकेटपटू
१९७२ : पारस म्हांब्रे क्रिकेटपटू
१९७६ : प्रसिद्ध भारतीय महिला कसोटी व एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू देविका पळशीकर यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६८ : हेन्रिच रॉथ जर्मनीतील संस्कृत विद्वान आणि धर्मप्रसारक (जन्म: १८ डिसेंबर १६२०)
१८३७ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (जन्म: २१ ऑगस्ट १७६५)
१९१७ : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जेम्समेसन क्राफ्ट्स यांचे निधन.
१९३० : ब्रिटीश कालीन रामपूर रियासतचे नवाब हमीद अली खान बहादूर यांचे निधन.
१९७२ : साली प्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ प्रा. कोट्टरलाकोटा रंगधामा राव यांचे निधन.
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक पद्मभूषण डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)
१९९७ : बासू भट्टाचार्य चित्रफट दिग्दर्शनाच्या पदार्पणातच राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारे निर्माते व दिग्दर्शक (जन्म: १९३४)
१९९७ : वासुदेव वामन तथा 'भाऊसाहेब' पाटणकर ऊर्फ 'जिंदादिल' मराठीतले पहिले शायर (जन्म: ? ? १९०८)
२००७ : सुप्रसिद्ध भारतीय बंगाली चित्रपट अभिनेत्री अनिता गुहा यांचे निधन.
२००८ : चंद्रकांत गोखले अभिनेते (जन्म: ७ जानेवारी १९२१)
२००९ : पाकिस्तान देशाचे कीटकशास्त्रज्ञ, प्राध्यापक, अभिनेते आणि उद्योजक दतुक रहमान अन्वर सय्यद यांचे निधन.
२०१० : माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू गुंडीबाईल रामा सुंदराम यांचे निधन.
२०१३ : भारतीय पत्रकार डिकी रुतनागुर यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १९३१)
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)

# पुणे बाजार समितीमधील सेस गळती रोखणार - सभापती प्रकाश जगताप

पुणे : पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सेस गळती होत आहे. ही गळती कमी करत उत्पन्न वाढीवर भर देणार आहे. मात्र या बाबत पणन संचालकांकडून केली जाणारी चौकशी चुकीची असल्याचा दावा बाजार समितीचे नवनिर्वाचित सभापती प्रकाश चंद्रकांत जगताप यांनी केला. तसेच बाजार समितीच्या गैरव्यवहारांच्या चौकशीच्या बाबतीत माहिती नसल्याचेही ते म्हणाले.



पुणे बाजार समितीच्या सभापतिपदाची निवडणूक शुक्रवारी झाली. श्री. जगताप यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप यांनी निवड जाहीर केली. या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना सभापती जगताप म्हणाले, ''बाजार समितीवर झालेले सर्व आरोप हे राजकीय प्रेरणेतून झालेले आहेत. पणन संचालकांनी ५१ मुद्द्यांवर लावलेली चौकशी चुकीची आहे.

बाजार समितीमध्ये कायम कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्यामुळे सेसमध्ये काही प्रमाणात गळती असल्याचे जगताप यांनी मान्य केले. ही सेस गळती रोखत दरवर्षी उत्पन्न ५ ते १० टक्क्यांनी वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले. गैरव्यवहारांच्या चौकशांच्या फेऱ्यात अडकलेल्या बाजार समितीला कसे बाहेर काढणार या प्रश्नावर श्री. जगताप म्हणाले, ''आम्ही निवडणुकीच्या धामधुमीत होतो. त्यामुळे गैरव्यवहारांच्या झालेल्या आरोपांबाबत कल्पना नाही. त्यानुषंगाने आम्ही सर्व एकत्रित येऊन त्यावर विचार विनिमय करून उत्तर देऊ. दोन वर्षांपूर्वी बाजार समितीचे उत्पन्न ८० कोटी रुपये होते. ते सध्या १०६ कोटींवर गेले आहे. बाजार समितीत गैरप्रकार झाले असते तर उत्पन्न इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढले नसते.''

# नाथ महाराज मंदिर परिसरात सर्वत्र पसरले घाणीचे ढीग

## मागण्या पूर्ण न केल्यास सहकाऱ्यांना सोबत घेऊन उपोषण करणार –रोहित फावडे

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरातील नगरपरिषद अंतर्गत गायकवाड गल्ली येथील प्रसिद्ध नाथ महाराज मंदिर असून अनेक भाविक राज्यभरातून नाथ महाराज यांचे दर्शन देण्यासाठी येत असतात व रोज सकाळी परिसरा सह तालुक्यातील भाविक रोज नित्य दर्शन घेण्यासाठी येत असतात मंदिराच्या या पूर्ण परिसरात मागच्या अनेक दिवसापासून सर्वत्र घाणीचे लोट पसरले असल्याने येणाऱ्या भाविकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना परिसरात पूर्ण पसरलेला दुर्गंधीमुळे आजार होऊ शकतात व डेंग्यू, मलेरिया या सारखे अनेक आजारानं आमंत्रण मिळू शकते यावर नगरपरिषद प्रशासनाने सोई सुविधा उपलब्ध करून होणाऱ्या गैरसोई, समस्या टाळाव्यात यासाठी दि.१८ जुलै शुक्रवार रोजी नाथ महाराज मंदिर परिसरातील अनेक युवकांनी एकत्र येऊन नगरपरिषद प्रशासनास निवेदन देऊन सर्वत्र झालेली घाणीचे लोट तात्काळ उचलून स्वच्छता सह परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे व अनेक मागण्याची निवेदन नगरपरिषद प्रशासनास दिले आहे.






शहरातल्या प्रसिद्ध नाथ महाराज परिसरातील मंदिराच्या अवती भोवती अनेक समस्या असून प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन तात्काळ समस्या सोडून केलेल्या मागण्या पूर्ण कराव्यात व मंदिराच्या चारही बाजूने सिमेंट कंपाऊंड असताना परिसरातील नागरिकांनी कंपाउंडच्या आत मोठ्या प्रमाणात घाण कचरा, हाडाचे भाग टाकल्याने परिसरात कचऱ्याचे ढिगारे साचले असून परिसर सर्वत्र घाण झालेला आहे व कंपाऊंडच्या आत कचरा, व मांसाहारी हाडाचे खोड टाकल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे व या पुढे कोणी टाकू नये यासाठी प्रशासनाने योग्य त्या सूचना करून विनाकारण कंपाउंडच्या आत कचरा टाकणाऱ्यांवर नगरपरिषद प्रशासन व धारूर पोलीस प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी यावेळी निवेदनात युवकांनी केली आहे.

नाथ महाराज मंदिर हे ऐतिहासिक मंदिरापैकी एक मंदिर असून या मंदिराच्या परिसरात कायम स्वच्छ परिसर ठेवण्यासाठी धारूर नगरपरिषदेने लक्ष देण्याची मागणी यावेळी निवेदनात केली आहे व झालेली दुर्गंधी तात्काळ उचलून परिसर स्वच्छ करावा यासह केलेल्या मागण्या १) नाथ महाराज मंदिराचे परिसरात व आजुबाजूने सुरक्षा म्हणुन सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. २)मंदिराचे परिसरात तात्काळ लाईटची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, ३) मंदिर परिसरात १०० झाडांची लागवड करण्यात यावी, ४) मंदिर परिसरात दर आठ दिवसला नगर परिषदे मार्फत स्वच्छता करण्यात यावी,५) येणाऱ्या भाविकांना बसण्यासाठी मंदिर परिससरात सिमेंट बाकडे बसविण्यात यावेत, ६) मंदिर परिसरात वारंवार विविध कार्यक्रम होत असतात त्यामुळे कचरा विल्हेवाट लावण्याकरीता डस्टबीन ठेवण्यात यावेत, ७) मंदिराचे सुरक्षा करीता प्रवेशद्वारा जवळ लोखंडी गेट बसविण्यात यावे. या मागण्याचे निवेदन धारूर नगरपरिषदेला यावेळी युवकांनी दिले व प्रशासनाने सोईसुविधा उपलब्ध तात्काळ करून दखल घ्यावी अशी मागणी केली आहे व मागण्या पूर्ण न केल्यास धारूर नगरपरिषद कार्यालय समोर दि.३१ जुलै २०२५ रोजी पासून नगर परिषद कार्यालय समोर उपोषण करणार असल्याचे निवेदनात निवेदनकर्ते यांनी म्हटले आहे.

यावेळी प्रशासनास मागण्याची निवेदन देण्यासाठी उपस्थित पत्रकार रोहित फावडे, पृथ्वीराज औताडे, वैभव चव्हाण, ॲड.मोहन भोसले, रविराज फावडे, जय शिंदे, अमर वैष्णव, अमोल सिरसट, सोनू शिंदे, बबलू गायकवाड, अमर भांडवलकर, विनय शिंदे, योगेश सावंत, ऋषी गाकवाड,हर्ष डूबे, सिद्धार्थ गायकवाड, वैभव खावतोडकर या सह गायकवाड गल्लीतील मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

# नवीन कायद्यामुळे लोकशाही मजबूत होईल – ॲड. सालपे

## जय भवानी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्यावतीने एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

अलीकडच्या काळात समान नागरी कायदा वन इलेक्शन नेशन अशा कायद्याबाबत चर्चा होत आहे. ही नवीन कायदे अस्तित्वात आली तर भारताचे लोकशाही अधिक मजबूत होईल, असे मत अँड उदयसिंह सालपे यांनी व्यक्त केले.



पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. नवीन कायदे या विषयावर ही कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून धर्मदाय आयुक्त बीडचे अँड. उदयसिंह सालपे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य सोमनाथ घाडगे सर, प्रमुख पाहुणे म्हणून माननीय बबनराव काकडे, प्राध्यापक वंदन जाधव, प्रा.विनोद किरदक व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांचा महाविद्यालयाच्या वतीने विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लोखंडे यांनी केले. यावळी प्रमुख पाहुणे ॲड, सालपे यांनी अलीकडच्या काळात उदयास आलेल्या नवीन कायदेविषयक माहिती दिली. बबनराव काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, विद्यार्थ्यांनी संविधानाचा अभ्यास करून अस्तित्वात आलेल्या नवीन कायद्याचे अध्ययन करून कायद्याची अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात आयक्यूएससी समन्वयक प्राध्यापक विनोद किर्तन यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संविधानात असलेले कायदे आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणतात त्यामुळे कायद्याचा अभ्यास करून त्याची आपण अंमलबजावणी केली पाहिजे असे आवाहन त्यानी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रा डॉ. वंदन जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. शिवाजीराव काकडे, प्रा.संदीपान किवणे यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यशाळेसाठी राज्यशास्त्राचे सर्व विद्यार्थी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे विद्यूत मोटार पंप चोरांचा सुळसुळाट !

## नेकनूर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता; पोलिस प्रशासनाचे जाणिवपुर्वक दुर्लक्ष

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश परिसरात काही महिन्यांपासून छोट्या मोठ्या भुरट्या चोऱ्या, विद्युत मोटारी चोरणे, रोहित्राचे वायर चोरी अशा घटना घडत असुन गेल्या ६ महिन्यात २२ विद्युत मोटार चोरीच्या घटना घडुन संबंधित प्रकरणी पोलिस प्रशासनाला तक्रारी करूनही पोलिस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असुन शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेल्या पंधरा दिवसात दोन वेळा विद्युत मोटार वायरच्या चोरीची घटना घडलेल्या मुळे वस्तीवरील शेतकरी रामदास मुळे यांनी विहिरीत पाणी असुन पिकांना पाणी देता येईना झाले आहे. तर जनावरांबरोबरच माणसांच्या पिण्याच्या पाण्याची अडचण असल्याची संतप्त प्रतिक्रिया दिली. याचवेळी लिंबागणेश येथील सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी ३ महिन्यांपूर्वी विद्युत मोटार, पेटी आणि वायर चोरीची घटना घडल्याची लेखी तक्रार नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना दिल्यानंतर त्यांनी फिर्याद घेतली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही नेकनुर पोलिस स्टेशन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला आहे. पावसाने ओढ धरल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर असतानाच शेतकरी उपयोगी साहित्य चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून, चोरट्यावर लगाम लावण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर उपाययोजना करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

१५ दिवसांत दोन घटना

लिंबागणेश येथील मुळे वस्तीवरील रोहित्रांवर जवळपास २० शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन असुन गेल्या १५ दिवसांत मोटार वायर चोरीच्या घटनाची हि दुसरी घटना असुन माझ्या विहिरीवरील १५०० फुट वायर, विद्युत पेटी असा एकुण ३० हजार रुपयांहून अधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे याचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी रामदास मुळे, डिगांबर मुळे,सूदाम मुळे, सुभाष मुळे,रामराजे मुळे, अशोक मुळे, नवनाथ मुळे, प्रकाश मुळे यांनी केली आहे.

# प्राचार्य सिद्दीकी नवीद यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा थाटात संपन्न

बीड। प्रतिनिधी

शहरातील नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्दिकी नवीद हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा संस्थेकडून सेवापूर्ती सोहळा थाटात साजरा करण्यात आला.

या सत्कार सोहळयाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष सिराजोद्दीन देशमुख होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुभाषचंद्र सारडा, डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा (संचालिका – आदित्य शिक्षण संस्था, बीड), ख़्वाजा फरीदोद्दीन देशमुख (सचिव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी), युसुफजई नसरुल्लाह खान (सदस्य, प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट बीड) यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट बीड संचलित, नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड चे प्राचार्य सिद्दीकी नवीद यांच्या सेवानिवृती निमित्ताने भव्य सत्कार समारंभ शनिवार दि. १२ जूलै २०२५ रोजी विद्यालयाच्या प्रांगणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रमुख पाहुण्यांचा शाल व पुष्पहाराने सत्कार करण्यात आला. प्राचार्य सिद्दिकी नवीद यांनी संस्थेत प्रथम सहशिक्षक पदावर १९९४ ते २०२१ अशी २५ वर्षे कर्तव्य बजावले तर २०२१ ते २०२५ अशी चार वर्षे मुख्याध्यापक-प्राचार्य पदावर उत्कृष्ट कर्तव्य पार पाडले. प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट बीडचे अध्यक्ष व सचिव यांनी आपल्या भाषणात प्राचार्य सिद्दीकी नवीद यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या योगदानाचे कौतुक केले. प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट बीड द्वारे चालविण्यात येणारे सर्व उर्दू व मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक, प्राचार्य व सर्व शिक्षकवृंद तर्फे प्राचार्य सिद्दीकी नवीद यांचा शॉल व पुष्पगुच्छ देऊन भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शेख अब्दुल रहिम यांनी केले तर आभार प्रदर्शन शेख ज़मीर यांनी केले.

# धुतेकर संगीत विद्यालयाचा गुरुवंदना कार्यक्रम उत्साहात

बीड । प्रतिनिधी

धुतेकर संगीत विद्यालयाच्या वतीने आयोजित गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवंदना कार्यक्रम अत्यंत उत्साही आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे वाय. जनार्दन राव, अमरजी डागा, सुदर्शन धुतेकर आणि सौ. अंजली धुतेकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन व कै. विष्णुपंत धुतेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर विद्यालयाचे संचालक श्री सुदर्शन धुतेकर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अंजली धुतेकर यांचे विद्यालयातील शिष्यांच्या वतीने सन्मानपूर्वक गुरुपूजन करण्यात आले.



या कार्यक्रमात विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुमधुर अशी बहारदार गीते सादर केली, तसेच वैयक्तिक गायन सादर करत रसिकांची मने जिंकली. स्थानिक कलावंतांनी देखील या कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्या गायनातून कार्यक्रमाची शोभा वाढवली. संपूर्ण कार्यक्रमात गुरूभक्तीचा आणि संगीतसाधनेचा समरस भाव अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाला भारत अण्णा लोळगे, श्रीकांत कुलकर्णी, महेश वाघमारे, लताताई कोकीळ, वासवदत्ता हसेगावकर, गिरीष कुलथे, सुधीर देशमुख, नामदेव साळुंके, नरहरी दळे, बालाजी मानगिरे, वासुदेव काजळे, डॉ. थेटे, स्वयंप्रकाश खडके, शेख मझहर या मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सतीश छाजेड, मोहन खेत्रे, केदारनाथ चव्हाण, डॉ. संजय कुलकर्णी, सचिन मार्गे, श्रीकांत दहिवाळ, पुनम धुताडमल, समीक्षा नागरगोजे, पल्लवी पंडीत, सृष्टी मेहेत्रे, कांचन पारगावकर, कांबळे सर, अशोक कदम सर, दिनकर थोरात, कैवल्य धुतेकर, कौशिक धुतेकर यांच्यासह सर्वच शिष्यांनी विशेष परिश्रम घेतले. गायन सादरीकरणात हार्मोनियमवर साथ संगत श्री सुदर्शन धुतेकर सर व सचिन मार्गे यांनी केली, तर तबल्यावर केदारनाथ चव्हाण, बालाजी मानगिरे, सचिन मुरमे, नरहरी दळे, राजवीर कुल्थे आणि मिहिर भट यांनी उत्कृष्ट साथ दिली. कार्यक्रमाचे ओघवते निवेदन अविनाश ढेरे सर यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम रसिक प्रेक्षकांच्या मनात खोलवर गारुड करून गेला आणि गुरूप्रतीची कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सांगीतिक सोहळा एक अविस्मरणीय अनुभव ठरला.

# पत्रकाराची अल्टो कार घरासमोरून लंपास

## इच्छापूर्ती श्री साईबाबा मंदिर, पाचोड रोड वरील घटना

अंबड । प्रतिनिधी

अंबड येथील पत्रकार रविंद्र कारके यांची मारुती सुझुकी कंपनीची सिल्वर कलरची अल्टो एल एक्स आय जिचा क्र. एम एच १२ डी एम ८७०६ ही दि.१५ जुलै च्या रात्र ९: ००वाजता त्यांनी घरामसोर लावली होती दिनांक १६ जुलैच्या भल्या पहाटे ३:३१ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी इच्छापूर्ती साईबाबा मंदिर पाचोड रोड अंबड येथून पळवली आहे.

रविंद्र कारके त्यांच्या मालकी हक्काची अल्टो एल एक्स आय एम एच १२ डी एम ८७०६ ही कार जिची अंदाजे किंमत रुपये १५०,००० (एक लाख पन्नास हजार रुपये) अशी असून त्यांनी दररोज प्रमाणे इच्छापूर्ती श्री साईबाबा मंदिर पाचोड रोड अंबड येथील घरासमोर काल दि. १५ जुलै रोजी संध्याकाळी ९.०० वाजेच्या सुमारास उभी केली व जेवन वगैरे करून झोपी गेले. त्यानंतर दि १७ जुलै रोजी सकाळी ७.०० वाजेच्या सुमारास त्यांची पत्नी मिना रविंद्र कारके ही झाडू मारण्यासाठी घराच्या बाहेर आल्या असता त्यांना सदर अल्टो कार दिसून न आल्याने सदर कारचा आजुबाजुला व इतरत्र शोध घेऊन त्यांनी पती रविंद्र कारके व मुलगा मंगेश कारके आपली गाडी घरा समोर दिसत नसून तुम्ही कोण्या मित्राला दिली आहे का असे विचारले असता रवींद्र कारके यांनी नाही म्हटले व सदर गाडीच्या शोध कामी मित्रमंडळाला नातेवाईकांना घटने संदर्भात अवगत करून शोधूनही गाडी मिळत नसल्याने रविद्र कारके यांच्या फिर्यादीवरून आज दि. १७ जुलै रोजी अंबड पोलिसातअज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे... घटनेचा तपास अंबड पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल संदीप कुटे यांच्याकडे पुढील तपास देण्यात आला असल्याची माहिती अंबड पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार यांनी दिली आहे.

# अपडाऊन करणारे मुख्याधिकारी यांच्याकडे जिल्हाधिकारी लक्ष देतील का?

## हे बघा, मोदीजींचे स्वच्छ भारत मिशन ; डासांचा सुळसुळाट, दुर्गंधीने नागरीक त्रस्त

जालना । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक तसेच जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी मुख्यालयी राहतात. पण बदनापूरचे मुख्याधिकारी मुख्यालयी का राहत नाहीत असा प्रश्न उपस्थित झाला आहे. अशा मुख्याधिकाऱ्यावर जिल्हाधिकारी कारवाई करणार का? असे आता विचारले जावू लागले आहे.

बदनापूर शहरात गल्ली-बोळांपासून मुख्य रस्त्यांपर्यंत साचलेली घाण आणि तुंबलेले गटार हे ‘स्वच्छ भारत’च्या स्वप्नाला हरताळ फासणारे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. वाढत्या डासांच्या संख्येमुळे डेंग्यू व व्हायरल तापाचे रुग्ण वाढू लागले असून, नागरीक दुर्गंधी व रोगराईच्या कचाट्यात सापडले आहेत. प्रशासनाचे सोयीस्कर दुर्लक्ष आणि ढिसाळ नियोजन यामुळे शहरातील स्वच्छता पूर्णपणे कोलमडली आहे. शहरातल्या प्रत्येक वॉर्डात कचऱ्याचे ढिगारे आणि साचलेल्या पाण्यामुळे निर्माण झालेले दुर्गंधीयुक्त वातावरण नागरिकांच्या आरोग्याला धोका ठरू लागले आहे.स्थानिक नागरीक संतप्त आहेत. “दरवर्षी लाखोंचा खर्च करून सुद्धा शहरात स्वच्छतेचे नामोनिशाण नाही. हा निधी खरोखर स्वच्छतेसाठी खर्च होतो की दुसऱ्याच कुणाच्या खिशात जातो, हे कोण तपासणार?” असा संतप्त सवाल नागरीक करत आहेत. नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी निष्क्रियतेमुळे शहराची विद्रूप स्थिती झाली असून, नागरिकांनी आता आवाज उठवायला सुरुवात केली आहे. प्रशासनाने वेळेत उपाय योजना केली नाही, तर शहरातील संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

### नागरिकांच्या मागण्या

शहरात तातडीने स्वच्छता मोहिम राबवावी डास निर्मूलनासाठी फवारणीची व्यवस्था करावी. सांडपाण्याच्या योग्य निचऱ्याची यंत्रणा उभी करावी. दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

बदनापुर शहरात ठिकठिकाणी घाण मोदीजी च्या स्वच्छ भारत मिशनने खाली घातली मान, कदाचित नगरपंचायतला डॉक्टर लोकांकडून हफ्ते पक्के झाले असावेत. मार्केट कमीटी मध्ये सकाळी फिरायला जा आणि मच्छारांना सोबत घेऊन या, अशी स्थिती शहराची झाली आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने दखल घेण्याची गरज आहे.

– मनिषा दांड, बदनापूर.

**टीसी हरवला आहे**


प्रज्योत महेश पुरी रा.अंबड ता.अंबड जि. जालना याची संत रामदास कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय घनसावंगी या महाविद्यालयाची इ. डल. ढध पासची टीसी प्रवासा दरम्यान हरवली आहे तरी सापडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क : ८५५७८९९५६४**

# रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रलंबित निधी तत्काळ वितरीत करा–खा.कल्याण काळे

जालना । प्रतिनिधी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) सन २०२१–२२ पासून प्रलंबित असलेल्या वैयक्तिक व सार्वजनिक कामांच्या निधीबाबत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आज मा. आयुक्त (मनरेगा), महाराष्ट्र शासन यांना नागपूर येथे पत्र देऊन तातडीने निधी वितरीत करण्याची मागणी केली आहे.



या पत्रात त्यांनी स्पष्ट केले आहे की, जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांतील शेतकरी व अन्य लाभार्थ्यांचे कुशल कामांचे बिले गेली अनेक वर्षे प्रलंबित असून, शेतकऱ्यांनी केलेल्या सिंचन विहिरी, शेततळे, फळबाग लागवड, गायगोठा यांसारख्या वैयक्तिक कामांचा मोबदला अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत असून, शासनाविषयी नाराजी वाढत आहे. जालना जिल्ह्यातील प्रलंबित कामांचा आढावा: वैयक्तिक कामे ६०८४ (₹३२६६.८५ लक्ष) सार्वजनिक कामे १४३६ (₹११२०२.८३ लक्ष) एकूण कामे ७५२० । एकूण निधी मागणी ₹१४४६९.६९ लक्ष छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रलंबित कामांचा तपशील: वैयक्तिक कामे १६६५८ (₹१८२१८.३८ लक्ष) सार्वजनिक कामे १२४५ (₹८९९७.६८ लक्ष) एकूण कामे १७९०३ । एकूण निधी मागणी ₹२७२१६.०६ लक्ष एकूण दोन्ही जिल्ह्यांतील निधी मागणी: ₹४१६८५.७५ लक्ष (४१६ कोटींपेक्षा अधिक) खासदार डॉ. काळे यांनी पत्रात नमूद केले आहे की, लाभार्थी शेतकरी व ग्रामीण जनता दररोज तक्रारी घेऊन येत असून, निधी न मिळाल्याने त्यांच्या समस्या अधिकच गंभीर होत आहेत. रोजगार हमी योजनेविषयी प्रसारमाध्यमांमध्ये सातत्याने नकारात्मक वृत्त येत असून, प्रशासनावरही दबाव वाढत आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी शासनाकडे दोन्ही जिल्ह्यांचा प्रलंबित निधी तातडीने वितरीत करण्याची आग्रही मागणी केली आहे, जेणेकरून लाभार्थ्यांना दिलासा मिळेल आणि योजनेवरील विश्वास टिकून राहील.

# झाडे लावा, संगोपन करा अन् पृथ्वीला नष्ट होण्यापासून वाचवा -पंजाब डक

आष्टी । प्रतिनिधी

एकीकडे शासन वृक्ष लागवड करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत आहे. वृक्षारोपण ही चळवळ पुढे नेण्यासाठी अनेक सामाजिक संघटना जीवाचे रान करीत आहेत. तरीही राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरूच आहे. शासनाच्या वतीने प्रत्येक वर्षी काही कोटी झाडे लावले जातात मात्र त्याचे संगोपन होत नाही नुसते झाडे लावून काहीही फायदा नाही त्याकरिता त्याचे संगोपन देखील महत्त्वाचे आहे.याला शासकीय यंत्रणांनी वेळीच पायबंद घालण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजचे आहे.येणाऱ्या काळात जर वृक्षतोड



थांबली नाही येणाऱ्या काळात वृक्षतोड जर थांबली नाही तर पाऊस तर कमी होईलच मात्र पृथ्वीचा देखील नाश होण्याची चिन्हं आहे त्यामुळे निसर्गाचा कोप होणार असून तो कुणालाच परवडणार नसल्याचे मत हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केले.

ते आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने वृक्षमित्र पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष योगेश भंडारी,सचिव हेमंतकुमार पोखरणा,हितेश जामदार,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी,माजी सभापती संजय ढोबळे,मोटार परिवहन अधिकारी अविनाश दळवी,माजी सरपंच अनिल ढोबळे,गोकुलदास मेहेर,बाबूलाल भंडारी,डॉ उमेश गांधी,महेंद्र पटवा,कांतीलाल चानोदिया,बिपीन भंडारी,आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुणे येथील इलेस्टिक रन कंपनी कडून शाळेला१७ लॅपटॉप देण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते राज्यात विविध भागात वृक्ष चळवळ उभी करणाऱ्याना वृक्षमित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये महेश खरमाळे, प्रशांत गिर्हे, प्रशांत मुथा, सुहास कडू,शिवशंकर चाफुले,मिलिंद गिरधारी,सचिन झाडमुखे,श्रीमती तनुजा डोके,वैष्णवी पान ३ वर

# वाळुमाफीयाची हर्सुलला रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श नवनीत काँवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुंडगिरीचे समुळ उच्चाटनकरण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन एमपीडिए कायद्या अंतर्गत एका वाळू माफियाची हरसूल कारागृहात रवानगी करण्यात आली.



सहा. पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे पोलीस ठाणे चकलांबा, जि. बीड यांनी दिनांक २२.०८.२०२४ रोजी आरोपी सुरज विठ्ठल ढाकणे वय २७ वर्षे रा. मुंगी ता. शेवगांव जि. अहील्यानगर याचे विरुद्ध स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी यांना सादर केला होता.सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पोलीस ठाणे चकलांबा येथे खुनाचा प्रयत्न करणे, दरोडा टाकणे, जाळपोळ करणे, गौण खनिज वाळुची चोरी करणे, वाळुचोरीचा प्रयत्न करणे, सरकारी कामात अडथळा आणणे, सरकारी नौकरावर हल्ला करणे, मारहाण करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे अवैद्यशस्त्र बाळगणे, वगैरे स्वरुपाचे ०९ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहेत. सर्व गुन्हे न्याय प्रविष्ठ आहेत. सदरील व्यक्ती हा गौण खनिज वाळुचोरीचे व इतर गंभीर स्वरुपाचे गुन्हेकरत असल्याने पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासुन करडी नजर होती.प्रकरणात अविनाश पाठक, तत्कालीन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक १९.०९.२०२४ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सूल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध करणे बाबत आदेश पारीत केले होते.यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना स.पो.नि. नारायण एकशिंगे पो.स्टे. चकलांबा यांना दिल्या होत्या. स्थानबध्दतेचे आदेश पारीत झाल्या पासुन सदरचा इसम हा स्वतः चे अस्तीत्व लपवुन वावरत होता. तसेच तो पोलीसांना गुंगारा देवून फरार होता. सदरची बाब ही पोलीस पान ३ वर



बीड :शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध चाचण्या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी मोफत राबविण्यात आल्या. या शिबिरात ६० ते ७० पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले.

# अजित पवार, धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकारांसाठी आरोग्य शिबिर

## मराठी पत्रकार परिषद वैद्यकीय कक्ष व राजकिशोर पापा मोदी मित्रमंडळाच्या वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन - डॉ.इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार व आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दिनांक २० जुलै रोजी अंबाजोगाई तालुक्यातील पत्रकार बांधवांसाठी मराठी पत्रकार परिषद वैद्यकीय कक्ष व राजकिशोर पापा मोदी मित्र मंडळाच्या वतीने भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आसुन या आरोग्य तपासणी शिबिराचा पत्रकार बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय कक्ष प्रमुख सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले व राजकिशोर (पापा) मोदी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



शहरातील समाधान मानसोपचार रूग्णालय व व्यसनमुक्ती केंद्र व नेत्रालय, हाऊसिंग सोसायटी, पंचायत समिती जवळ, अंबाजोगाई या ठिकाणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार व आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दिनांक २० जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत या वेळेत अंबाजोगाईत या भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात पत्रकार बांधवांची आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आली आहे. १५ जुलै रोजी माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचा वाढदिवस आहे. २२ जुलै रोजी राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने अंबाजोगाईत या भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात पत्रकार बांधवांची डोळ्यांची तपासणी, हृदयरोग तपासणी, त्वचारोग तपासणी,ज्यांना आवश्यकता आहे अशांची इ सी जी,टूडी इको, सोनोग्राफी, रक्ताची तपासणी करण्यात येणार आहे अशी माहिती मराठी पत्रकार परिषद वैद्यकीय कक्ष प्रमुख सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी दिली आहे. या धकाधकीच्या जीवनात पत्रकार बांधव आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात त्याचे काहीवेळा गंभीर परिणाम पत्रकार बांधवांना आरोग्य विषयक समस्यांनी भोगावे लागतात या करिता आरोग्य तपासणी शिबिराचा सर्व पत्रकार बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय कक्ष प्रमुख सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले व राजकिशोर (पापा) मोदी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत स्पर्धेसाठी नोंदणी करा -आमदार विजयसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

टिपरे आणि सोंग या लोककलेचे गेवराई शहराशी अतुट नाते आहे, या लोककलेची परंपरा जोपासण्याचे काम जाणीवपूर्वक आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून सुरु आहे. यावर्षीच्या टिपरे महोत्सवाचे आयोजन बुधवार, दि.३० जुलै रोजी होणार आहे. टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत स्पर्धेसाठी संघ आणि वैयक्तिक कलाकारांनी आपली नोंदणी करण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. महोत्सवाच्या पुर्व तयारीसाठी परिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. सुभाष निकम यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक संपन्न झाली. यामध्ये स्पर्धेची नियमावली, पारितोषिक यांसह इतर बाबींवर चर्चा झाली.



सालाबादा प्रमाणे याहीवर्षी शारदा प्रतिष्ठान, गेवराई यांच्यावतीने गेवराई विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून बुधवार, दि.३० जुलै रोजी सायं. ६ वाजता बाजारतळ, गेवराई येथे भव्य टिपरे महोत्सवाचे आयोजन गेवराई शहरात करण्यात येणार आहे. लोककलेचा आगळावेगळा दुर्मिळ ठेवा जतन करून संस्कृती संवर्धन करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. लोककलेला राजाश्रय देऊन ही परंपरा नव्या पिढीमध्ये रुजावी म्हणून भरघोस पान ३ वर

# मंगलाताई प्रकाश सोळंके यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थित रहा - सभापती जयदत्त नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी

सोहळा दातृत्वाचा, मातृत्वाचा आणि नेतृत्वाच्या अभिष्टचिंतनाचा हे ब्रिद वाक्य घेवुन सौ.मंगलाताई प्रकाश सोळंके यांच्या ७० व्या वाढदिवसानिमीत्त अभिष्टचिंतन सोहळा व सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन या होणाऱ्या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांनी केले आहे.



सौ.मंगलाताई प्रकाश सोळंके यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमीत्त लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि. २० जुलै रोजी सकाळी १०:०० वा. रक्तदान शिबीर, होणार आहे तर द अदर वर्ल्ड नाट्यप्रयोग सायं.६:०० वाजता होणार आहे.दि.२१ जुलै रोजी सायं.६:०० वाजता गझल संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असुन माजलगावकरांसाठी पर्वणीच ठरणार आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी डॉ. प्रकाश आनंदगावंकर हे तर प्रमुख पाहुण्या म्हणुन राजश्रीताई हेमंत पाटील, आमदार प्रकाश सोळंके यांची उपस्थिती असणार आहे तर माजी आमदार मोहनराव सोळंके, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, माजी आमदार बाजीराव जगताप,डॉ.आर. जी.बजाज,बहुजन नेते बाबुराव पोटभरे, चेअरमन विरेंद्र प्रकाश सोळंके,व्हा. चेअरमन जयसिंग धैर्यशिल सोळंके यांची उपस्थिती असणार आहे.या कार्यक्रमास माजलगावकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांनी केले आहे.

# धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीत भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- अंबादास गिरी

गेवराई । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून धाकलगाव, गेवराई, येथील माऊली भक्त आषाढ महिन्यांत धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी अशी पायी दिंडीचे आयोजन करण्यात येत असून याही वर्षी आज दि.२० जुलै रोजी पायी दिडी निघणार आहे तरी या दिंडीत सहभागासाठी माऊली भक्तांनी संपर्क साधून धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान माऊली भक्त अंबादास गिरी, विठ्ठल जगदाळे,वादे, दशरथ गावडे, बळीराम उडें, अशोक बीडे, यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे



दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात ते म्हणाले की गेली अनेक वर्षांपासून धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीचे आयोजन माऊली ग्रुपच्या वतिने करण्यात येत असून या दिंडीत मोठ्या प्रमाणात सहभाग घेत असतात तसेच धाकलगाव, शहागड, गेवराई, गढी,राजणी, पाडळसिगी,हिरापुर,पेडगाव, बीड , कपिलधार, माजंरसुबा नेकनुर, मार्गे चाकरवाडी या मार्गे पायी दिंडी काढण्यात येत असते तरी ज्या माऊली भक्तांना दिडीत सहभागी व्हायचे आहे त्यांनी अंबादास गिरी यांच्या ८६६९०९२०९४ या मोबाईल नबंरवर संपर्क साधून दिंडीत मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आव्हान अंबादास गिरी, विठ्ठल जंगदाळे, अशोक बीडे,बळीराम उडे, वादे,दशरथ गावडे आदीनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे

# बदनापूरच्या शिवभोजन केंद्रात गैरकारभार? चौकशीची मागणी

जालना । प्रतिनिधी

शासनाच्या गोरगरिबांसाठी सुरू केलेल्या शिवभोजन योजनेत गंभीर गैरकारभार होत असल्याचा आरोप करत, बदनापूरमधील शिवभोजन केंद्राची तातडीने सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्यात यावी, अन्यथा तीव्र उपोषण करण्यात येईल, असा इशारा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेने दिला आहे.

प्रभारी तहसीलदार हेमंत तायडे यांना दिलेल्या निवेदनात, या केंद्रावर चाललेला प्रकार म्हणजे शासनाच्या योजनेचा सरळसरळ गैरवापर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित केंद्र चालकाने शासनाची अनुमती नसताना खासगी विद्यार्थ्यांची मेस सुरू केली असून, त्याच विद्यार्थ्यांचे फोटो वापरून शासनाकडून शिवभोजन योजनेचे अनुदान घेत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.


या प्रकारामुळे गरजू नागरिकांना शिवभोजन योजनेचा लाभ मिळत नसून, गरीब जनता उपाशी राहत असल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. त्यामुळे या केंद्राच्या मागील तीन महिन्यांतील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून सच्चाई समोर आणावी व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.ही मागणी विलास खैरे, निखिल सोनवणे, विकास खरात, दत्ता खरात व राजू ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असून, कारवाई न झाल्यास उपोषण करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

मुख्य मुद्दे गरिबांसाठी असलेल्या योजनेचा गैरवापर.विद्यार्थ्यांच्या नावावर अनुदान मिळवण्याचा प्रकार.सीसीटीव्ही तपासणीची मागणी. करण्यात येत आहे

# उत्पादन शुल्क विभाग झोपेत राजुरीत दारूच्या अड्ड्यांवर छापे

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री वाहतूक होत असताना संबंधित राज्य उत्पादन शुल्क विभाग मात्र मूग गिळून गप्प आहे अश्यात ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या राजुरी (न) मधील दारूच्या अड्ड्यांवर छापा मारून लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे व स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांनी या कारवाया केल्या. पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्यावर कठोर करावायांच्या सूचना दिलेल्या असताना राजुरीमध्ये दारूची विक्री जोरात सुरु होती. हातभट्टीचे अड्डे सुरु असल्याचे पोलिसांना कळल्यानंतर पहाटे ५ वाजल्यापासून राजुरीतील सहा ठिकाणी छापा मारण्यात आले. या कारवाईत ४ लाखांच्या देशी-विदेशी दारू जप्त करण्यात आली असून हातभट्टी दारूचे अड्डे उद्धवस्त करण्यात आल्याचे कळते. या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, स्थानिक गुन्हे शाखेतील आनंद मस्के, नामदेव सानप, दादा सानप, बळीराम राठोड, पठाण, चालक पवार यांचा समावेश होता.

# 'निर्धार नवपर्वाचा' पदाधिकारी संवाद मेळाव्यास उपस्थित रहा-चव्हाण, गवते

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत दि.२० रोजी सकाळी १०..३० वाजता स्व.यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे निर्धार नवपर्वाचा- पदाधिकारी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे अवाहन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, युवा नेते बळीराम गवते यांनी केले आहे.



निर्धार नवपर्वाचा-पदाधिकारी संवाद मेळाव्यास राष्ट्रवादीचे नेते आ.धनंजय मुंडे, राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते अमरसिंह पंडित, युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, महिला आघाडीच्या नेत्या रूपालीताई चाकणकर, आमदार प्रकाश दादा सोळंके,आमदार विजयराजे पंडित,कल्याण काका आखाडे, आनंद परांजपे, प्राध्यापक मगरे, संध्या सोनवणे, लतीफ तांबोळी,यांची प्रमूख उपस्थित राहणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने निर्धार नवपर्वाचा- पदाधिकारी संवाद मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. या मेळाव्यातून पदाधिकाऱ्यांना नवीन उर्जा मिळणार असून या निमीत्ताने राष्ट्रवादी पक्ष गावपातळीपर्यंत घेवून जाण्यास अधिकची मदत होणार आहे.आज सकाळी १० वाजता मेळावा पान ३ वर

# राजस्थानी गणेश मंडळच्या अध्यक्षपदी गोपाल सोनी, सचिवपदी तिलक

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परळी येथील राजस्थानी गणेश मंडळाची नूतन कार्यकारिणी नुकतीच उत्साही वातावरणात जाहीर करण्यात आली. मंडळाच्या अध्यक्षपदी गोपाल बालकिशन सोनी तर सचिवपदी तिलक झुंबरलाल चरखा यांची एकमुखाने निवड करण्यात आली.

ही बैठक मंडळाच्या कार्यालयात पार पडली. प्रारंभी मागील वर्षीच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचा प्रस्ताव मांडण्यात आला,




जो उपस्थित सदस्यांनी एकमताने मंजूर केला. गोपाल सोनी आणि तिलक चरखा हे दोघेही मंडळाच्या कार्यात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असून, त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक उपक्रम यशस्वीपणे पार पडले आहेत. त्यांच्या कार्यतत्परतेवर देण्याचा आमचा प्रयत्न असेल. सर्वांच्या सहकार्याने उत्सव सदस्यांनी पूर्ण विश्वास व्यक्त करत जपत नव्या विचारांना चालना त्यांच्या निवडीचे स्वागत केले. निवडीनंतर अध्यक्ष गोपाल सोनी म्हणाले, ''गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाज प्रबोधन व एकोप्याचा महत्त्वाचा माध्यम आहे. पान ३ वर

# समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध -राज्यमंत्री नाईक

बीड । प्रतिनिधी

राज्यातील सर्व समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध आहे. बंजारा समाजाचे देखील विविध प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे प्रतिपादन उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले.

गेवराई येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त गोर बंजारा समाजाच्यावतीने आयोजित एकता मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी आमदार विजयसिंह पंडित, मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख रामेश्वर नाईक, महाराष्ट्र राज्य




औद्योगिक विकास महामंडळाचे सहआयुक्त विजय राठोड, साहेबराव शास्त्री महाराज, सचिन महाराज, चैतन्य महाराज, अमरसिंह पंडित, नाईक फाऊंडेशनच्या ॲड्‌मोहिनीताई इंद्रनील नाईक, उत्तम चव्हाण, प्रा. पी.टी.चव्हाण, बाबुराव जाधव, अण्णासाहेब राठोड, राजेश पवार, सतीश पवार, अनिल राठोड आदींची उपसिवती होती. राज्यस्तरीय बंजारा भूषण पुरस्कार समस्त गोर समाजाच्या वतीने देऊन राज्यमंत्री नाईक यांना सन्मानित करण्यात आले. यासह राज्य लोकसेवा आयोग, दहावी, बारावी, अभियांत्रिकी आदी क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या गुणवंतांचा राज्यमंत्री नाईक यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. अमरसिंह पंडित, उत्तम चव्हाण, पी.टी.चव्हाण, रामेश्वर नाईक, साहेबराव शास्त्री, ॲड मोहिनी नाईक यांनी विचार मांडले. सुरूवातीला माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रास्ताविक उत्तम चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
रविवार, दि.२० जुलै २०२५ । पान ७

# कसबा गणपती मंडळाची यंदा आगळीवेगळी संकल्पना; अष्टविनायकांतील बल्लाळेश्वर मंदिराची भव्य प्रतिकृती उभारणार

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याचा मानाचा पहिला आणि शहराचे ग्रामदैवत म्हणून ओळखला जाणारा कसबा गणपती मंडळ यंदाच्या गणेशोत्सवात भक्तांसाठी एक आगळीवेगळी आणि आध्यात्मिक अनुभव देणारी संकल्पना घेऊन येत आहे. रायगड जिल्ह्यातील अष्टविनायकांपैकी एक असलेल्या पाली येथील श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिराची भव्य प्रतिकृती यंदा कसबा गणपतीच्या मंडपात उभारली जाणार आहे. त्यामुळे पुण्यातच ग्रामदैवत व अष्टविनायकाचे दर्शन एकाच ठिकाणी घडणार असून, लाखो गणेशभक्तांसाठी ही पर्वणी ठरणार आहे.





मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे म्हणाले, गेल्या काही वर्षांपासून आम्ही अष्टविनायक मंदिरांच्या प्रतिकृती साकारतो आहोत. यंदा पाली येथील श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिराची प्रतिकृती साकारून भक्तांना पालीला प्रत्यक्ष न जाता येथेच त्याचा अनुभव घेता यावा, हा आमचा हेतू आहे. त्यामुळे भक्तांची आध्यात्मिक यात्रा समृद्ध होईल. पाली येथील श्री बल्लाळेश्वर हे अष्टविनायकातील एकमेव गणेश मंदिर आहे, ज्याचे नाव भक्ताच्या नावावरून ठेवले गेले आहे. मंदिराची वैशिष्ट्यपूर्ण वास्तुकला, सूर्योदयावेळी मूर्तीवर पडणारे सूर्यकिरण आणि परिसरातील ऐतिहासिकता याचे दर्शन यंदा पुण्यातच घडणार आहे. या विशेष मंडपाची प्राणप्रतिष्ठा गुजरातचे स्वामी सवितानंद यांच्या हस्ते होणार असल्याची माहितीही शेटे यांनी दिली.

मंडपाच्या बांधकामासाठी विशेष कुशल कारागिरांची नियुक्ती करण्यात आली असून, गिरीश कोळपकर यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू आहे. पाली मंदिरातील प्रत्येक बारकावे, दगडी नक्षीकाम, मुख्य गाभाऱ्याची रचना, तसेच सूर्योदयावेळी मूर्तीवर पडणाऱ्या किरणांचा देखावा इथेही प्रत्यक्षात उभा केला जाणार आहे. कसबा गणपती पुण्यातील गणेशोत्सवात मानाचा पहिला म्हणून विसर्जन मिरवणुकीचे नेतृत्व करतो. त्यामुळे दरवर्षी येथे हजारो भाविकांची गर्दी असते. यंदाच्या या भव्य व वैभवशाली संकल्पनेमुळे पुण्यातील गणेशोत्सवाला एक नवे रुप येईल.

कसबा गणपती हा पुणे शहरातील मानाचा पहिला गणपती मानला जातो. पुण्याची ग्रामदेवता म्हणून कसबा गणपती ओळखला जातो. कसबा गणपती हे पुण्याचे प्रमुख देवता (ग्रामदेवता) आहे. कसबा गणपती हा पुणे, महाराष्ट्रातील पहिला मानाचा गणपती, किंवा सर्वात आदरणीय गणपती मानला जातो. या मूर्तीची स्थापना १८९३ मध्ये झाली आणि ती पुण्यातील कसबा पेठ परिसरात आहे, जो शहराचा एक प्राचीन भाग आहे. कसबा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ हे पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आहे. इतर चार मंडळांसह या मंडळाला पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीत मानाचे स्थान आहे. हा गणपती विसर्जन मिरवणुकीत अग्रभागी असतो.

# पवना डॅमजवळ अभिनेत्रीच्या फार्महाऊसवर चोरी, टीव्ही, फ्रीज, बेड, चोरट्यांनी सगळंच पळवलं !

**पुणे । प्रतिनिधी**


चंदेरी दुनियेतील हिंदी फिल्म सिनेतारका संगीता बिजलानी (डरपसशशींर इळक्षश्ररपळ कींश ढहशषीं) यांच्या पवना धरणाच्या बँक वॉटरला असलेल्या तिकोना पेठ येथील फार्म हाऊसमध्ये चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. यामध्ये चोरट्यांनी रोख रक्कम, व टीव्ही असा ऐवज लंपास केला आहे. ५० हजार रुपयांची रोख रक्कम आणि ७ हजार रुपये किंमतीचा टीव्ही चोरला आहे. या घटनेबाबत मोहम्मद अझहर उद्दीन यांचे पीए मोहम्मद मुजीब खान यांनी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. मोहम्मद अजहर उद्दीन यांची पत्नी व अभिनेत्री संगीता बिजलानी यांच्या मालकीचा तो फार्म हाऊस आहे. या फार्म हाऊसच्या पाठीमागून चोरट्यांनी प्रवेश करत ग्रील उचकटून आत प्रवेश केला व ५७ हजार रुपयांचा ऐवज चोरी करून नेला. या प्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिनेश तायडे पुढील तपास करत आहेत. अभिनेत्रीने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत तिने सांगितले आहे की, चोरट्यांनी तिच्या फार्म हाऊसचे खूप नुकसान केले आहे आणि अनेक मौल्यवान वस्तू चोरल्या आहेत. संगीता बिजलानी चार महिन्यांनी पवना धरणाजवळील तिकोना गावात असलेल्या फार्म हाऊसवर आल्या होत्या, त्यानंतर त्यांना चोरीची माहिती मिळाली. पुणे ग्रामीण पोलिसांना दिलेल्या तक्रारीत संगीता बिजलानी म्हणाल्या की, मुख्य गेट आणि खिडकीच्या ग्रिल तुटल्या आहेत, एक टेलिव्हिजन सेट गायब आहे आणि बेड, रेफ्रिजरेटर तसेच सीसीटीव्ही कॅमेरे यासह अनेक घरातील वस्तूंचे नुकसान झाले आहे.



संगीता बिजलानी यांनी पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीप सिंग गिल यांना पाठवलेल्या अर्जात म्हटले आहे की, वडिलांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ती फार्महाऊसवर जाऊ शकत नव्हती. मी माझ्या दोन नोकरांसह फार्महाऊसवर गेले होते. तिथे पोहोचताच मुख्य दरवाजा तुटलेला पाहून मला धक्का बसला. आत गेल्यावर मला आढळले की खिडकीच्या ग्रिल्स तुटल्या होत्या, एक टेलिव्हिजन सेट गायब होता आणि दुसरा तुटलेला होता. अभिनेत्रीने तिच्या तक्रारीत पुढे म्हटले आहे की वरचा मजला पूर्णपणे अस्ताव्यस्त होता, सर्व बेड तुटलेले होते आणि अनेक घरातील वस्तू आणि मौल्यवान वस्तू एकतर गहाळ होत्या किंवा तुटलेल्या होत्या.

# महिला पोलीस लाच घेताना जाळ्यात, सहायक पोलीस निरीक्षकाचेही कनेक्शन

पुणे । प्रतिनिधी



रावेत पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक (एएसआय) राकेश पालांडे आणि महिला पोलीस अंमलदार राजश्री घोडे यांना ३० हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली. पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ही कारवाई केली.

या दोघांविरोधात एसीबीने गुन्हा नोंदवला असून, त्यांच्याविरोधात एका वकिलाच्या आशिलाला अटक न करण्यासाठी आणि न्यायालयात अनुकूल चार्जशीट सादर करण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे.

एसीबीचे सहाय्यक पोलिस आयुक्त दयानंद गावडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, एका ४६ वर्षीय वकिलाच्या आशिलाविरोधात रावेत पोलीस ठाण्यात कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल होता. या प्रकरणाचा तपास महिला पोलीस अंमलदार राजश्री घोडे करत होत्या. त्यांनी संबंधित वकिलाकडे ५० हजार रुपयांची लाच मागितली होती.

वकिलाने ही माहिती एसीबीला दिल्यानंतर शुक्रवारी सापळा रचण्यात आला. त्यानुसार, महिला पोलीस अंमलदार घोडे यांना ३० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. तपासादरम्यान एएसआय राकेश पालांडे यांनी या लाच प्रकरणात सहकार्य केल्याचेही निष्पन्न झाले आहे. या दोघांविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास उपअधीक्षक सत्यशील वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# वैष्णवी हगवणेच्या मृत्यूचं धक्कादायक कारण समोर; चौकशी अहवालाने खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात विधिमंडळाच्या महिला व बालहक्क समितीने चौकशी अहवाल सादर केला आहे. या अहवालात वैष्णवीचा मृत्यू हा कौटुंबिक हिंसाचार आणि हुंड्यासाठीचा अत्याचार यामुळेच झाल्याचं नमूद करण्यात आलंय. वैष्णवीचा मृत्यू हा नैसर्गिक मृत्यू नाही, किंवा ती फक्त आत्महत्येची घटना नाही तर तो हुंडाबळीचा प्रकार आहे. पोलिसांनी त्याच दिशेने तपास करण्याची गरज असल्याच अहवालात नमूद करण्यात आलंय. या समितीने आयपीएस अधिकारी जालिंदर सुपेकर यांच्याबाबत महत्वाची शिफारस अहवालात केली आहे.

सुपेकर यांचा सहभाग या प्रकरणात आढळून आला आहे. सुपेकरांची ध्वनिफीत देखील समोर आली. त्यामुळे सुपेकरांना निलंबित करून त्यांना सहआरोपी करण्याची शिफारस या समितीने केलीय. या समितीचे तिसरा महत्वाचा निष्कर्ष पुणे ग्रामीण पोलिसांबाबत आहे. पोलिसांच्या दुर्लक्षामुळे वैष्णवीची आत्महत्या घडल्याचं समितीने म्हटलंय. वैष्णवीची मोठी जाऊ मयुरीने मारहाण, छळ , विनयभंग , मारून टाकण्याची धमकी अशा अनेक प्रकारच्या तक्रारी केल्या होत्या. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने वैष्णवीची आत्महत्या झाल्याचं म्हटलं आहे.



वैष्णवी हगवणे हिने शुक्रवारी (१६ मे २०२५) राहत्या घरात गळफास घेतला. वैष्णवी यांचे वडील आनंद कस्पटे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, वैष्णवीच्या लग्नात ५१ तोळे सोने, फॉर्च्यूनर गाडी, चांदीची भांडी देण्यात आली. त्यानंतर लग्नाच्या दुसऱ्या दिवसापासून शशांक व तिचे सासू-सासरे यांनी घरातील किरकोळ कामाच्या वादातून तिच्याबरोबर भांडण सुरू केले. तिच्या चारित्र्यावरून बोलणं वैष्णवीला सासऱ्याच्या लोकांनी शारीरिक व मानसिक त्रास देणं चालू केलं होतं. पती, सासू-सासरे, नणंद, दीर यांनी हुंड्यासाठी मानसिक छळ करून कुर वागणूक दिली. पोस्ट मार्टममध्ये वैष्णवीच्या अंगावर मारहाणीचे व्रण आढळले होते.

वैष्णवी हगवणे मृत्यूप्रकरणात तपासात त्रुटी १. वरिष्ठ पो.अधिकारी जालिंदर सुपेकर यांची चौकशी करण्याची आवश्यकता . २. जालिंदर सुपेकरांना तपासापासून दूर ठेवा. ३. प्रकरण आत्महत्येचे दिसत असले तरी पूर्णतः कौटुंबिक हिंसाचार, अत्याचार व हुंडाबळीचे . ४. जालिंदर सुपेकरांचा सहभाग आढळल्यास निलंबित करून सहआरोपी करा. ५. वैष्णवी हगवणेंना पती,सासरच्या लोकांकडून अमानुष मारहाण,छळ,जाच झाला. ६. हुंडा रुपात ब्रँडेड गाडी,चांदीची भांडी,सोने,रोख रक्कम घेतल्याचे सबळ पुरावे.

# पुण्यातील 'मोहम्मदवाडी'चे नामांतर 'महादेववाडी' होणार? एकनाथ शिंदे गटाच्या प्रस्तावाने खळबळ उडाली

**पुणे । प्रतिनिधी**

काही दिवसापूर्वी भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी पुणे रेल्वे स्टेशनच्या नामांतराचा मुद्दा छेडला होता. रेल्वे स्थानकाला थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव द्यावे, अशी मागणी केली होती. त्यांच्या या मागणीवरून मोठं वादंग पेटल्याचे पाहायला मिळाल. त्यांच्या या मागणीला विरोध दर्शवत अनेकांनी आपली भूमिका मांडली होती. त्यानंतर आता पुन्हा पुणे जिल्ह्यातील मोहम्मदवाडी गावाचे नाव बदलण्याची मागणी करण्यात आली आहे.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या शिवसेनेकडून ही मागणी करण्यात आली आहे. मोहम्मदवाडीचे नाव बदलून महादेववाडी करण्याची शिवसेनेची मागणी आहे. शिंदे गटाच्या प्रस्तावामुळे चर्चेला वेग आला आहे.शिवसेना आमदार भरत गोगावले यांनी त्यांच्या पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांना गावाचे नाव बदलण्याचा विचार करण्याची विनंती केली आहे.

गावकऱ्यांचा असा दावा आहे की मोहम्मदवाडी हे नाव त्यांच्या इतिहासाशी किंवा संस्कृतीशी काहीही संबंध नाही. त्यांना हे देखील माहित नाही की ते कोणी आणि का ठेवले? गावाचे नाव बदलण्याचा प्रस्ताव १९९६ मध्ये मंजूर झाला होता, परंतु तो कधीही अंमलात आला नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या भागाला भेट दिली तेव्हा स्थानिकांनी त्यांची मागणी पुन्हा मांडली. आता, भरत गोगावले यांनी मुख्यमंत्र्यांना अधिकृतपणे पत्र लिहिले आहे आणि आमदार योगेश टिळेकर यांनीही चालू विधानसभेच्या अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला आहे, त्यामुळे गावाचे नाव लवकरच बदलले जाऊ शकते अशी अटकळ बांधली जात आहे.

# राजीव गांधी प्राणीसंग्रहालयातील चितळ हरणांचा मृत्यू; विषबाधा की आणखी काही?

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कात्रज येथील राजीव गांधी प्राणी संग्रहालयात चितळ हरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर मृत्यू झाल्यानंतर प्राणीप्रेमींकडून चिंता व्यक्त केली जात आहे. पण या प्रकारानंतर प्राणिसंग्रहालय प्रशासन सतर्क झाले असून, तातडीने विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यात आल्याची माहिती आहे. संपूर्ण घटनेनंतर चितळ हरणांना क्वारंटाईन करण्यात आले आहे. सध्या त्यांना इतर प्राण्यांपासून पूर्णतः अलिप्त ठेवण्यात आले असून, इतर प्राण्यांशी होणारा कोणताही थेट संपर्क रोखण्यात आला आहे.

तसेच चितळांसाठी स्वतःचा स्वतंत्र ॲनिमल कीपर नेमण्यात आला आहे. या परिसरात कोणालाही सहज प्रवेश दिला जात नाही. सॅनिटायझर व जंतुनाशकांचा वापर केल्यानंतरच खंदकात प्रवेश मिळतो, अन्यथा तो पूर्णतः बंद ठेवण्यात आला आहे. प्राणिसंग्रहालयातील खंदक परिसरात ब्लीचिंग पावडरने निर्जंतुकीकरणाचे काम सुरू आहे.

गेल्या काही दिवसांत १६ चितळ हरणांचा अचानक मृत्यू झाल्याने ही धोक्याची घंटा ठरली आहे. संभाव्य साथीच्या आजाराच्या भीतीने प्रशासन सतर्क झाले आहे. सध्या मृत्यूचे खरे कारण स्पष्ट नसले तरी, विषबाधा अथवा संसर्गजन्य आजाराचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. अधिकृत तपासणी अहवाल येईपर्यंत प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाय अधिक तीव्र केले आहेत.




७-१२ जुलै, २०२५ दरम्यान जवळपास १५-१६ चितळ मृत्युमुखी पडल्याची बामती उघडकीस आली. यात १४ मादी व २ नर चितळ हरणांचा समावेश आहे. साथीच्या आजारांवरील (विशेषतः षेींरपर्वोीींह वळीशरीश) अथवा खाद्यातून किंवा पाण्यातून विषबाधा झाली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. त्याचबरोबर, उरलेल्या सर्व चितळांना क्वारंटाईन करण्यात आले आहे. तसेच त्यांचीही वैद्यकीय तपासणी सुरू आहे. मृत प्राण्यांचे ऑर्गन आणि रक्ताचे नमुने बरेली, नागपूर, भुवनेश्वर, भोपाळ, पुणे यांसारख्या विविध ठिकाणी असलेल्या नामांकित प्रयोगशाळांमध्ये पाठवण्यात आले आहेत.

# वाघोलीत खड्डे मुक्तीचा निर्धार! संपत गाडे याचा अभिनव उपक्रम



**वाघोली । प्रतिनिधी**

वाघोली (तालुका हवेली) येथील समाजसेवक संपत आबा गाडे यांनी वाघोली परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पावसाच्या पाण्यामुळे निर्माण झालेले खड्डे पुणे मनपाच्या मदतीने दूर करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या माध्यमातून अनेक ठिकाणचे खड्डे बुजून वाहतूक कोंडीमुक्त परिसर करण्याचा निर्धार गाडे यांनी केला आहे. याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

समाजसेवक संपत आबा गाडे यांनी सांगितले की, वाघोली मधील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, शिरूर हवेलीचे आमदार माऊली कटके, याचबरोबर पुणे महानगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सहकार्यातून ठिकठिकाणी पडलेले खड्डे तातडीने बुजवून वाहतूक कोंडी मुक्त परिसर बनवण्याकडे प्रयत्न सुरू असून कायमस्वरूपी रस्त्याची दुरुस्ती करण्यात येत आहे. बकोरी फाटा परिसरातील खड्डे बुजवले जात असून उर्वरित भागातील देखील खड्डे बुजून वाघोलीचा भाग वाहतूक कोंडी मुक्त तसेच खड्डे मुक्त करण्यात येत आहे. वाहतुकीला अडथळा होऊ नये म्हणून रात्री अप रात्री देखील युद्ध पातळीवर खड्डे दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे.

# अभियांत्रिकीतील 'टॉपर' बनला चोर; ४ लाख ७४ हजार रुपयांचे दागिने लांबवून कर्नाटकात पसार

**पुणे । प्रतिनिधी**

सराफी पेढीतून चार लाख ७४ हजार रुपयांचे दागिने लांबवून कर्नाटकात पसार झालेल्या एका तरुणाला विश्रामबाग पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी अभियांत्रिकी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी असल्याची माहिती तपासात मिळाली आहे. आर्थिक चणचणीमुळे त्याने दागिने चोरल्याचे तपासात उघडकीस आले.



या प्रकरणात अटक करण्यात आलेला १९ वर्षीय तरुण मूळचा कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील अरनहळ्ळी गावातील रहिवासी आहे. बाजीराव रस्त्यावर एक सराफी पेढी आहे. एक ग्रॅम वजनाच्या दागिने विक्रीसाठी (फॉर्मिंग ज्वेलरी) ही सराफी पेढी प्रसिद्ध आहे.

पेढीच्या वरच्या मजल्यावरील प्रसाधनगृहाच्या खिडकीतून आत प्रवेश करून त्याने चार लाख ७४ हजारांचे दागिने लांबविले होते. दुसऱ्या दिवशी चोरीचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर पेढीच्या मालकाने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक राजेश उसगावकर आणि तपास पथकाने २५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासले. तांत्रिक तपासात पसार झालेला चोरटा कर्नाटकात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांचे पथक कर्नाटकात रवाना झाले.

चार दिवस पोलिसांचे पथक त्याच्यावर पाळत ठेवून होते. १६ जुलै रोजी त्याला कोलार परिसरातील गांधीनगर भागात सापळा लावून पकडले. चौकशीत त्याने आर्थिक अडचणीमुळे गुन्हा केल्याची कबुली दिली. परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त हृषीकेश रावले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे, सहायक पोलीस निरीक्षक राजेश उसगावकर, पोलीस कर्मचारी आशिष खरात, राहुल मोरे, शैलेश सुर्वे, सचिन अहिवळे आदींनी तपास केला.

# पुण्यात नशेच्या गोळ्यांचा साठा पकडला ; आरोपीकडून ५.७४ लाखांच्या मेथाम्फेटामाइन गोळ्या जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

बेकायदेशीरपणे शक्तीशाली आणि उत्तेजक मानल्या जाणाऱ्या, तसेच डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्रकी करण्यास मनाई असणाऱ्या मेथाम्फेटामाइन गोळ्यांची विक्री करणाऱ्यास फरासखाना पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून तब्बल ५ लाख ७४ हजार रुपयांच्या गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपी मूळचा बंगलोर येथील आहे. निशान हबीबमंडल (४७, रा. बंगळुरू, कर्नाटक) असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई गजानन सोनुने यांनी तक्रार दाखल केली आहे.



आरोपी हबीबमंडल हा बंगलोरमध्ये मागील वीस वर्षांपासून आयात-निर्यातीचा व्यवसाय करत आहे. या व्यवसायात तोटा झाल्याने हे बेकायदा कृत्य केल्याचे त्याचे म्हणणे आहे. मात्र, पोलीस त्याचे वक्तव्य पडताळून पाहात आहेत. त्याने या गोळ्या पश्चिम बंगाल येथून पार्सलद्वारे मागवल्या होत्या. त्यानंतर त्या घेऊन तो पुणे शहरात आला होता. त्याची विक्री करण्याआधीच त्याला अटक करण्यात आले आहे. येथे तो त्याची विक्री कोणाला करणार होता, याचा तपास केला जात असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक शीतल जाधव यांनी दिली. ही गोळी डॉक्टर अतिक्रियाशीलता विकार, नाइट फॉल आणि लठ्ठपणाच्या उपचारासाठी वापरतात. डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखालीच गोळीचा वापर केला जातो. मात्र, जिममधील काही तरुण बॉडी बिल्डिंगसाठी, तर काही नशेखोर नशेसाठी याचा वापर करतात. याचे सेवन केल्यास मेंदूमध्ये असणारे डोपामाइन (नैसर्गिक रसायन) सिक्रीशन वाढतं. अर्थात हे रसायन मेंदूत स्रवतं. डोपामाइनच्या सिक्रीशनमुळे तुमच्या मनात समाधान आणि आनंदाची भावना निर्माण होते. मात्र, जेव्हा ते मोठ्या प्रमाणावर स्रवतं तेव्हा सेवन करणाऱ्या व्यक्तीत एनर्जी वाढते आणि जास्त उत्साही झाल्यासारखं वाटतं. स्वतःला आनंदी आणि उत्साही ठेवण्याच्या नादात लोक मेथाम्फेटामाइनचा वापर करतात. पुढे ही सवय व्यसनात बदलते; पण याच्या अतिवापरामुळे मृत्यू ओढवू शकतो.अमेरिकेतील तरुणांमध्ये या ड्रगची नशा सर्रास केली जाते.

# मंत्राद्वारे तुला बकरी बनवेल धमकी देत मांत्रिकाकडून विधवा महिलेची २.६० लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील उच्चभ्रू कोरेगाव पार्क भागात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. स्वतःला तांत्रिक असल्याचे भासवून एकाने विधवा महिलेची २ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी कोरेगाव पार्क पोलिसांनी मोहम्मद खांसाहिब जान मदारी या व्यक्तीला अटक केली आहे. त्याने ही घटना कोणास सांगितल्यास महिलेला मंत्राद्वारे तुला बकरी बनवेल, अशी धमकी दिली होती.

फिर्यादी महिला कोथरूड परिसरातील असून, ती दोन मुलांची आई आहे. आर्थिक अडचणींमुळे मदतीच्या शोधात असताना, एका ओळखीच्या महिलेमार्फत तिचा परिचय मदारीशी झाला. मदारीने तिला सांगितले की, तो तांत्रिक उपायांनी सोन्याचा हंडा तिच्यासाठी आणणार असून, त्यामुळे तिचे आर्थिक भाग्य पालटेल.

यासाठी त्याने महिलेला विशिष्ट पूजा करण्यास सांगितले आणि त्या बदल्यात २ लाख ६० हजार रुपये घेतले. त्यानंतर मदारीने




पूजा करून एक काळ्या कपड्यात गुंडाळलेला माठ तिला दिला व तिला १७ दिवसांनी रात्री ११ वाजून २१ मिनिटांनी तो उघडण्यास सांगितले. महिलेने सांगितलेल्या वेळेनुसार माठ उघडला असता, त्यात केवळ माती आढळली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तिने मदारीशी संपर्क साधला. मदारीने तिला १६ जुलैला सायंकाळी घरी बोलावले.

पोलिसांनी आधीच सापळा रचून ठेवलेला असल्याने, त्याच ठिकाणी मदारीला अटक करण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील थोपटे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), संगीता जाधव, सहायक पोलीस निरीक्षक शिल्पा निमकर, पोलीस हवालदार प्रवीण पडवळ, मयूर शिंदे आणि विवेक जाधव यांच्या पथकाने केली. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२) आणि अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणा प्रतिबंधक कायदा कलम ३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केल्यानंतर १९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.